सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. ०५ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ३३ पाने : ८ किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## हल्लेखोरांना प्रत्युत्तर देण्याची जबाबदारी माझी

### सरंक्षण मंत्री राजनाथ सिंहांचा पाकिस्तानला इशारा, पंतप्रधान मोदींची कार्यशैली आणि दृढनिश्चय सर्वांनाच परिचित

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- संरक्षण मंत्री म्हणून माझी जबाबदारी सशस्त्र दलांसोबत काम करणे आणि भारताविरुद्ध वाईट हेतू असलेल्यांना योग्य उत्तर देणे आहे. देशावर हल्ला करणार्यांना प्रत्युत्तर देण्याची जबाबदारी माझी आहे, अशा शब्दांमध्ये संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला आज (दि.४ मे) इशारा दिला. तुम्ही आमच्या पंतप्रधानांना चांगले ओळखता, त्यांची कार्यशैली आणि दृढनिश्चय तुम्हाला परिचित आहे, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

संस्कृती जागरण महोत्सवाला संबोधित करताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले, '' राजकारण हा शब्द राज आणि नीती या दोन शब्दांपासून बनलेला आहे; परंतु विडंबना अशी आहे की राजकारण या शब्दाचा अर्थ आता हरवला आहे. मला पूज्य संतांचे आशीर्वाद हवे आहेत. भारतीय राजकारणात ते पुन्हा स्थापित करण्यासाठी मला तुमचे आशीर्वाद हवे आहेत.

या वेळी राजनाथ सिंह म्हणाले की, ''एक राष्ट्र म्हणून, आपल्या शूर सैनिकांनी नेहमीच भारताच्या भौतिक स्वरूपाचे रक्षण केले आहे. दुसरीकडे आपल्या ऋषीमुनींनी भारताच्या आध्यात्मिक स्वरूपाचे रक्षण केले आहे. एकीकडे आपले सैनिक युद्धभूमीवर लढतात, तर दुसरीकडे आपले संत जीवनाच्या मैदानावर लढतात. संरक्षण मंत्री म्हणून माझ्या सैनिकांसोबत जवळून काम करणे आणि देशाच्या सीमांची सुरक्षा सुनिश्चित करणे ही माझी जबाबदारी आहे. आपल्या देशावर वाईट नजर ठेवणाऱ्यांना योग्य उत्तर देण्याची माझी जबाबदारी आहे.

देशातील जनतेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कार्यशैली माहित आहे. त्यांचा दृढनिश्चय देखील ते ओळखतात. मी तुम्हाला खात्री देऊ इच्छितो की तुम्हाला



जे हवे आहे ते पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली नक्कीच होईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. पंतप्रधान मोदींनी २०४७ पर्यंत संपूर्ण देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचे लक्ष्य आपल्या सर्व देशवासीयांसमोर ठेवले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह सोमवारी (दि.५) दिल्लीत जपानी संरक्षण मंत्री जनरल नाकातानी यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेणार आहेत. दोन्ही बाजू सध्याच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा परिस्थितीवर तसेच द्विपक्षीय संरक्षण सहकार्य आणखी वाढवण्याच्या मार्गांवर चर्चा करतील. भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव वाढला असताना होणार्या बैठकीला महत्त्व प्राप्त झाले आहे. भारत आणि जपानमध्ये जुनी मैत्री आहे. अलिकडच्या काळात भारत आणि जपानमधील संरक्षण देवाणघेवाण मजबूत झाली आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला भारत जोरदार उत्तर देण्याची तयारी करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिन्ही संरक्षण दलाच्या प्रमुखांची चर्चा केलेली आहे आणि भारताच्या संरक्षण सज्जतेचा आढावा घेतला आहे. नरेंद्र मोदी यांनी हल्ल्याचा कट रचणाऱ्यांना त्यांच्या कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा मिळेल, असा इशारा दिला होता. भारताकडून पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी देखील केली जात आहे.

## पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या दोघांना अटक, पंजाब पोलिसांची कारवाई

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. भारताने पाकिस्तानच्या विरोधात अनेक मोठे निर्णय घेत पाकिस्तानची चहुबाजूने कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे. पाकिस्तानमधून होणाऱ्या आयातीवरही भारताने बंदी घातली आहे. दरम्यान, सध्या दोन्ही देशामध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाल्याचं पाहायला मिळत आहे.

असं असतानाच पाकिस्तानी गुप्तहेर नेटवर्कचा पर्दाफाश करण्यात आला असून दोन जणांना पंजाब पोलिसांनी अटक करत मोठी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. अमृतसर ग्रामीण पोलिसांनी शनिवारी अमृतसरमधील लष्करी छावणी क्षेत्र आणि हवाई तळांची संवेदनशील माहिती आणि छायाचित्रे लीक करण्याच्या आरोपाखाली दोन जणांना अटक केली आहे.

या आरोपींची ओळख पटली असून शेर मसीह आणि सूरज मसीह अशी त्यांचे नावे असल्याचं सांगितलं जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. ही माहिती देताना पंजाबचे पोलीस महासंचालक गौरव यादव यांनी सांगितलं की, ''प्राथमिक तपासात पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणांशी या दोन आरोपींचे संबंध असल्याचं उघड झालं आहे. हे संबंध अमृतसर मध्यवर्ती कारागृहात असलेल्या हरप्रीत सिंग उर्फ पिट्टू यांच्या माध्यमातून स्थापित झाले आहेत. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.''

तसेच या प्रकरणाचा तपास जसजसा पुढे जाईल तसे आणखी महत्त्वाचे खुलासे होण्याची शक्यता असल्याचंही पोलीस महासंचालक गौरव यादव यांनी स्पष्ट केलं. तसेच ते पुढे असंही म्हणाले की, ''पंजाब पोलीस भारतीय सैन्याबरोबर खंबीरपणे उभे आहेत आणि राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी सक्षण आहेत. आपल्या सशस्त्र दलांच्या सुरक्षेला हानी पोहोचवण्याचा कोणताही प्रयत्न केल्यास कडक आणि तात्काळ कारवाई केली जाईल'', असंही त्यांनी म्हटलं.

## बारावीचा निकाल आज जाहीर होणार

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- राज्यातील बारावीचा निकाल उद्या म्हणजे ५ मे रोजी जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ५ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे. याबाबत राज्य शिक्षण मंडळाने माहिती दिली आहे. तर मंगळवारपासून (६ मे) महाविद्यालयमध्ये विद्यार्थ्यांना गुणपत्रिका दिली जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं उच्च माध्यमिक प्रमाणपत्र निकालासाठी अधिसूचना जारी केली आहे. अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र बोर्ड बारावीचा निकाल उद्या दुपारी जाहीर केला जाईल. बोर्डाच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यानंतर, विद्यार्थी अधिकृत वेबसाईट .. वर जाऊन गुणपत्रिकेची प्रत डाऊनलोड करून निकाल पाहू शकतील. दरम्यान, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी-मार्च २०२५ दरम्यान दहावी आणि बारावीची परिक्षा घेण्यात आली.

**खालील संकेतस्थळांवर विद्यार्थ्यांना निकाल पाहता येतील**

mahresult.nic.in
results.digilocker.gov.in
mahahsscboard.in
https://hscresult.mkcl.org/

निकाल पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना आपला रोल नंबर आणि आईचे पहिले नाव आवश्यक असेल. निकालानंतर काही आठवड्यांत पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करता येईल. तर जुलै-ऑगस्ट २०२५ मध्ये पुरवणी परीक्षा आयोजित केली जाईल, आणि त्याचा निकाल सप्टेंबर २०२५ मध्ये जाहीर होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या २०२५ च्या बारावी परीक्षेसाठी एकूण १५,१३,९०९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ही परीक्षा ११ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२५ दरम्यान राज्यभरातील ३,३७३ परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात आली होती .

## पैठणला रस्तेकडील जिल्ह्याच्या नावाला काळे

पैठण दि.४ (प्रतिनिधी)- काही दिवसांपासून पैठण छत्रपती संभाजीनगर तसेच पैठण अहिल्यानगर या रस्त्यावर रस्त्याकडीला असलेल्या किलोमीटर अंतर फलक व दगडांवर अज्ञातांनी छत्रपती संभाजीनगर तसेच अहिल्यानगर जिल्ह्याच्या नावाला काळे फासले असून पोलिसांनी या माथेफिरूंचा शोध घेऊन कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

महायुती शासनाच्या वतीने शासकीय रीत्या अधिकृतपणे आधीच्या औरंगाबाद जिल्ह्याचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर आणि अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर असे करण्यात आल्याने शासकीय दरबारी आता दोन्ही जिल्ह्याचे नाव हे छत्रपती संभाजीनगर तसेच अहिल्यानगर अशी झाली आहेत. शासकीय दफ्तर आणि दस्तावेजावर सुद्धा आता दोन्ही जिल्ह्यात छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर असे नाव







लिखिले जात आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने किलोमीटर अंतर दर्शक फलक तसेच दगडांवर छत्रपती संभाजीनगर तसेच अहिल्यानगर असे नाव लिहिण्यात आले होते. परंतू पैठणला पैठण छत्रपती संभाजीनगर आणि पैठण अहिल्यानागर रोडवर काही माथे फीरुंनी या जिल्ह्याच्या नावांना काळे फासले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याबद्दल तात्काळ काळे फासलेल्या फलकांवर तसेच दगडांवर छत्रपती संभाजीनगर तसेच अहिल्यानगर नाव लिहून अज्ञात माथेफिरून विरुद्ध पोलिसात तक्रार द्यावी तसेच पोलिसांनी दोषी विरुद्ध कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. काही महिन्यांपूर्वी तालुक्यातील हिरडपुरी गावांत असा प्रकार घडला होता. ज्यामुळे गावांत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणी ७ मे रोजी सुनावणी तर राष्ट्रवादी प्रकरणी १४ मे रोजी

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणावरील सुनावणी ७ मे रोजी होणार आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह प्रकरणावरील सुनावणी १४ मे रोजी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या वेळापत्रकात ही तारीख नमूद करण्यात आली आहे. दरम्यान, शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणावर जवळपास दीड वर्षानंतर सुनावणी होण्याची शक्यता आहे.

शिवसेनेत फुट पडल्यानंतर निवडणूक आयोगाच्या वतीने शिवसेना हे पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण हे पक्षाचे चिन्ह एकनाथ शिंदे यांना देण्यात आले होते. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरुद्ध फेब्रुवारी २०२३ मध्ये ठाकरे गटाकडून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यानंतर काही तारखा या प्रकरणाच्या पडल्या मात्र सुनावणी होऊ शकली नाही. सप्टेंबर २०२३ पासून हा विषय पटलावर आलेला नाही. नेहमीच तारीख दिली जात होती. मात्र, ती कोणत्या ना कोणत्या कारणाने पुढे जाते. जवळपास दीड वर्षाच्या कालावधीनंतर हे प्रकरण न्यायालयाच्या पटलावर आहे.

## धनंजय मुंडेंनी मला १८ तुकडे करण्याची धमकी दिली, करुणा शर्मा यांचा गंभीर आरोप

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर करुणा शर्मा यांनी पुन्हा एकदा गंभीर आरोप केले आहेत. करुणा शर्मा यांनी ऑक्टोबर २०२० पासून पोटगीची ६० लाखांची थकबाकी धनंजय मुंडे यांनी द्यावी यासाठी वांद्रे कोर्टात तीन अर्ज दाखल केले आहेत. तसेच धनंजय मुंडे यांच्याकडून धमक्या आणि छळ सुरूच असल्याची लेखी तक्रार करुणा शर्मा यांनी कोर्टात दिली आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना, स्वतः धनंजय मुंडेंनी मला १८ तुकडे करण्याची धमकी दिली असल्याचे करुणा शर्मा यांनी सांगितले आहे. लव्ह जिहादपेक्षा जास्त माझ्यावर अन्याय होत असल्याचा आरोप करुणा शर्मा यांनी केला आहे.

करुणा शर्मा म्हणाल्या, मला २ लाख पोटगी मिळाली तेव्हापासून तसेच आमदारकी रद्द होणार अशी कोर्टाकडून नोटीस आल्यापासून मला धमक्या येत आहेत. स्वतः धनंजय मुंडेंनी मला १८ तुकडे करण्याची धमकी दिली आहे. माझ्याविरोधात अजूनही हिंसा सुरूच आहे. यासंदर्भात कोर्टात तक्रार दिली आहे. व्हॉट्सअप चॅट, एनसी देखील पुरावे कोर्टात दिले आहेत. पोलिसांकडे देखील तक्रार दाखल केली आहे, मात्र ते काही करत नाही.

पुढे बोलताना करुणा शर्मा म्हणाल्या, ते किती पाण्यात आहेत, हे मी दाखवून देणार आहे. एफआयआर करा असे मी सांगितले होते, पण काहीही केले नाही. मला संरक्षण द्यायला कोर्टात सांगितले आहे, मात्र अद्याप काही केले नाही. मुलीला घेऊन जाणार अशी मला धमकी दिली जात आहे. तसेच मी पोटगी संदर्भात कोर्टात याचिका लवकरात लवकर मिळावी अशी मागणी केली आहे. मी मुख्यमंत्र्यांची वेळ मागितली आहे, त्यांनी वेळ दिला नाही. तरी मी मंत्रिमंडळ बैठकीला जाणार आहे आणि या संदर्भात त्यांच्याकडे तक्रार करणार आहे. लव्ह जिहादपेक्षा देखील अधिक जास्त माझ्यावर अन्याय होत आहे, असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे.

माजी मंत्री आणि आमदार धनंजय मुंडे हे कोर्टाच्या आदेशांना न जुमानता आपल्याला दररोज धमक्या आणि एआयच्या माध्यमातून मॉर्फ केलेले व्हिडिओ आणि फोटो पाठवून आपला छळ करत असल्याची लेखी तक्रार करूणा शर्मा यांनी कोर्टाकडे केली आहे.

माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडून आणि त्यांच्या लोकांकडून आपल्याला अजुनही धमक्या आणि आता एआयच्या माध्यमातून छळ सुरूच असल्याची तक्रार करूणा शर्मा यांनी कोर्टाकडे केली आहे. तसेच कोर्टानं पोटगीबाबत दिलेल्या आदेशांनुसार ६० लाखांची वसुली आणि करूणा यांच्या मालकीच्या संपत्तीची विक्री करू नये असे आदेश देण्याची मागणी करत करूणा शर्मा यांनी कोर्टात नव्यानं अर्ज केले आहेत.

कोर्टाच्या आदेशानंतरही धनंजय मुंडेंकडून धमक्या आणि छळ सुरूच. प्रकरण न्यायप्रविष्ट असेपर्यंत धनंजय मुंडे यांनी करूणा शर्मा यांना कुठल्याही प्रकारचा त्रास देऊ नये, असे कोर्टाचे स्पष्ट निर्देश असतानाही धनंजय मुंडे आणि त्यांच्या लोकांकडून आपल्याला दररोज जीवे मारण्याच्या धमक्या येत असल्याची तक्रार करत करूणा शर्मा यांनी वांद्रे दंडाधिकारी कोर्टानं नव्यानं अर्ज केला आहे. धमक्यांसोबत आपल्या मोबाईलवर आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून तयार केलेले अश्लील व्हिडिओही पाठवले जात असल्याचं त्यांनी तक्रारीत म्हटलं आहे. ज्या व्हीडिओ आणि फोटोत आपण नाही, तरीही त्यात आपणं असल्याचं दाखवून आपला मानसिक छळ केला जात असल्याचा आरोप करूणा मुंडे यांनी केला आहे. तसेच कोर्टानं दिलेल्या आदेशांनुसार दर महा २ लाख रूपये या हिशोबानं साल २०२२ पासून आपण आजवर ६० लाख रूपये पोटगीस पात्र असल्यानं त्याची कोर्टानं धनंजय मुंडे यांच्याकडून वसुली करावी अशी मागणीही करूणा शर्मा यांनी कोर्टाकडे केली आहे. तसेच आपल्या नावावर असलेल्या मालमत्तांची विक्री करण्यापासून मज्जाव करण्याचे आदेशही कोर्टानं जारी करावेत अशी मागणी करत तीन स्वतंत्र अर्ज करूणा शर्मा यांनी आपले वकील चंद्रकांत ठोंबरे यांच्यामार्फत कोर्टापुढे केले आहेत.

## वादळ वारा पाऊस कोसळणार! राज्याच्या विविध भागांना हवामान विभागाचा इशारा

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठं उन्हाचा तडाखा जाणवत आहे, तर कुठं ढगाळ वातावरण असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, पुढील ३ ते ४ दिवसात राज्याच्या काही भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. उत्तर कोकणसह उत्तर महाराष्ट्र आणि कोकणात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, विदर्भातील काही भागात ५० ते ६० किमी प्रति तासाने वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, सध्या राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा चांगलाच वाढल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. वाढत्या तापमानामुळं लोकांना घराबाहेर पडणे देखील मुश्कील झालं आहे. एका बाजूला तापमानाचा पारा वाढत असतानाच दुसऱ्या बाजुला पाण्याची कमतरता भासू लागली आहे. राज्यातील अनेक भागात टँकरने पाणीपुरवठा सुरु असल्याचं चित्र दिसत आहे. दरम्यान, पुढील तीन ते चार दिवसात उत्तर कोकणसह उत्तर महाराष्ट्र आणि कोकणात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

सध्या तरी संपूर्ण महाराष्ट्रात रात्रीचा उकाडा वा कुठेही उष्णतेच्या लाटेची शक्यता जाणवत नसल्याचे खुळे म्हणाले. दरम्यान, अरबी समुद्रात दिड किमी उंचीपर्यंत घड्याळ काटा दिशेने फिरणाऱ्या प्रत्यावर्ती चक्रीय वाऱ्याच्या स्थितीमुळे विदर्भ वगळता संपूर्ण महाराष्ट्रात ताशी ४५ ते ५० किमी वेगाने वाहणाऱ्या आर्द्रतायुक्त उत्तरी वाऱ्यामुळे हा वातावरणीय बदल समजावा असे खुळे म्हणाले.

## गोकुळचे दूध आजपासून दोन रुपयांनी महागणार

दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. उद्यापासून गोकुळ दुधाच्या दरात २ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, दुसरीकडे याचा फटका ग्राहकांना बसणार आहे. पुणे, मुंबईत म्हशीचं दूध प्रतिलिटर ७४ रुपये तर उर्वरित महाराष्ट्रात ६८ रुपये प्रतिलिटर असणार आहे. तर गायीच्या दुधात देखील २ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. मुंबई, पुण्यात ५८ रुपये तर उर्वरित राज्यात ५० रुपये प्रतिलीटर दर होणार आहे.

गोकुळचे दूध उद्यापासून दोन रुपयांनी महागणार आहे. पुणे आणि मुंबईत म्हैस दूध प्रतिलिटर ७४ रुपये दर होणार आहे. तर कोल्हापूरसह उर्वरित महाराष्ट्रात म्हैस दूध ६८ रुपये प्रतिलिटर होणार आहे. गायीच्या दूध दरात देखील प्रति लिटर दोन रुपयांनी केली वाढ करण्यात आली आहे. याचा फायदा राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना होमार आहे. मात्र, ग्राहकांच्या खिशाला जळ बसणार आहे.

दरम्यान, दूध संस्था आपल्या दुधाच्या दरात वाढ करत आहेत. याचा शेतकऱ्यांना कितपत फायदा होतो हे पाहणं देखील महत्वाचं आहे. कारण सध्या दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला कमी दर मिळत आहे. एका बाजुला चाऱ्याच्या, पशुखाद्याच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. तर दुसरीकडे दुधाला अपेक्षीत दर मिळत नसल्यानं दूध उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. अशातच दुसरीकडे मात्र, दूध संस्था दुधाच्या दरात वाढ करत आहेत. त्यामुळं शेतकऱ्यांच्या दुधाला चांगला दर न देता संस्था त्यांनी विक्री केलेल्या दुधाच्या दरात वाढ करत असल्याचे बोललं जात आहे.

## जम्मू-काश्मीरच्या रामबनमध्ये भीषण अपघात, लष्कराचा ट्रक ६०० फूट खोल दरीत कोसळल्याने ३ जवानांचा मृत्यू

श्रीनगर दि.४ (वृत्तसंस्था)- जम्मू-काश्मीरमधील रामबनमध्ये एका राष्ट्रीय महामार्गावर एका लष्करी वाहनाला भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. लष्कराचा ट्रक ६०० फूट खोल दरीत कोसळल्याने ३ जवानांचा मृत्यू झाला आहे. लष्कराचा हा ट्रक जम्मूकडून काश्मीरच्या दिशेने येत असल्याचं सांगितलं जात आहे. रामबन जिल्ह्यात लष्करी जवानांना घेऊन जाणारा हा ट्रक रस्त्यावरून घसरल्यामुळे हा अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे.

लष्कराच्या ट्रकचा अपघात घडल्यानंतर तातडीने स्थानिक पोलीस, लष्कर, एसडीआरएफ आणि सिव्हिल क्यूआरटीसह रामबन येथील स्थानिक स्वयंसेवकांनी बचाव कार्य सुरू केलं आहे. मात्र, या अपघातात ३ जवानांना जागीच मृत्यू झाला आहे, तर २ जवान गंभीर जखमी झाले असल्याचं वृत्त पीटीआयच्या हवाल्याने टाइम्स नाऊने दिलं आहे.

या अपघातात मृत्यू झालेल्या सैनिकांची ओळख पटली असून अमित कुमार, सुजीत कुमार आणि मान बहादूर असं या तीन जवानांचं नाव असल्याची माहिती आहे.वृत्तानुसार, त्यांचे मृतदेह दरीतून बाहेर काढण्यात येत आहेत. तसेच या अपघातात लष्कराच्या वाहनाचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

दरम्यान, जम्मूहून श्रीनगरला राष्ट्रीय महामार्ग ४४ वर लष्कराच्या वाहनाचा ताफा जात होता. मात्र, यातील एका लष्कराच्या ट्रकचे नियंत्रण सुटल्याने बॅटरी चष्माजवळ सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं की, या अपघातात गाडीचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे.

दरम्यान, याआधी पूंछ जिल्ह्यात देखील अशाच प्रकारच्या अपघाताची घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. लष्कराची एक गाडी ३५० फूट खोल दरीत कोसळली होती. त्यामध्ये ५ जणांचा मृत्यू झाला होता. चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात घडल्याची माहिती तेव्हा सांगण्यात आली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा लष्कराचा ट्रक ६०० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना घडली आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोमवार, ५ मे २०२५

https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## वंजारवाडी येथील अक्षय माने यांचा अपघातात मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.४ मे -**

वंजारवाडी येथून भुमकडे लुनावरून जात असलेल्या दोन तरुणांना ट्रेलरने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने एकाचा मृत्यू तर दुसरा जखमी झाला आहे.

ही घटना दि.१ मे २०२५ रोजी दुपारी १. ते १.३० वाजण्याच्या सुमारास पार्डी ते भुम रोडवरील श्रावणी हॉटेलसमोर घडली. मृत व्यक्तीचे नाव अक्षय अजिनाथ माने (रा. वंजारवाडी, ता. भुम) असे असून, त्यांच्यासोबत लुनावर असलेले राजाभाऊ नरहरी खोसरे हे गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, लुना क्र. एमएच २५ ए.झेड ३९०४ वरून हे दोघे प्रवास करत असताना ट्रेलर क्र. एमएच ४६ ए.एफ. ८४४३ चा चालकाने निष्काळजीपणे आणि भरधाव वेगात ट्रेलर चालवून त्यांच्या लुनाला पाठीमागून जोरदार धडक दिली. यामुळे अक्षय माने हे गंभीर जखमी झाले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला, तर राजाभाऊ खोसरे हे जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत.

या घटनेनंतर मयत अक्षय माने यांच्या आई सरस्वती माने (वय ४५, रा. वंजारवाडी) यांनी भुम पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### परंड्यात स्व. प्रमोद महाजन यांना अभिवादन

**परंडा, दि.४ मे -**

प्रेरणास्थान, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री, श्रद्धेय स्व. प्रमोद महाजन यांना पुण्यतिथीनिमित्त भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते संपर्क कार्यालय परंडा येथे प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. जहीर चौधरी, युवा नेते समरजीतसिंह ठाकूर, सारंग घोगरे, रामकृष्ण घोडके, अविनाश विधाते, तालुका उपाध्यक्ष बाबासाहेब जाधव, परसराम कोळी, रामदास गुडे, धनंजय काळे, आदर्श ठाकूर, सुरज काळे, किरण कवटे, उत्तम शिंदे, महिला मोर्चा शहराध्यक्षा जोती भातलवंडे तसेच इतर मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### खासदारांकडून ताकमोघे कुटूंबाचे सांत्वन

**तुळजापूर, दि.४ मे -**

तुळजापूर पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन ताकमोघे यांचे वडील प्रतापराव ताकमोघे यांचे दि.३० एप्रिल अक्षय तृतीयाच्या दिवसी अल्पशा आजाराने निधन झाले. धाराशिव जिल्ह्याचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी दि.३ मे रोजी ताकमोघे यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख शाम पवार, अनमोल साळुंके, राम मोगरकर, उपस्थित होते.



### विद्या विकास प्रतिष्ठानमध्ये बसवेश्वर जयंती साजरी

**लोहारा, दि.४ मे -**

धर्म जात पंथ याच्यापलीकडे जाऊन मानवतेची शिकवण देणारे महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती दिनाचें औचित्य साधून लोहारा तालुक्यातील जेवळी येथे विठ्ठल रखुमाई मंदिरात विद्या विकास प्रतिष्ठान या सेवाभावी संस्थेच्या वतीने महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन कार्यावर डॉ राजेंद्र चिकटे यांनी प्रकाश टाकला. या कार्यक्रमा प्रसंगी महात्मा बसवेश्वर यांचे विचार प्रत्येकाच्या मनात रुजले पाहिजे म्हणून डॉ. अशोक मेनकुदळे लिखित समतासूर्य महात्मा बसवेश्वर हे पुस्तक उपस्थितांना भेट म्हणून देण्यात आले. याप्रसंगी विद्या विकास प्रतिष्ठानचे साहित्यिक लेखक बाबुराव माळी, भारत काळे, वसंत ठेले, सह आदी महिला, पुरुष उपस्थित होते.




### राष्ट्रीय अग्निशामक दिनानिमित्त कर्मचाऱ्यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.४ मे -**

राष्ट्रीय अग्निशमन दिवसानिमित्त नगर परिषद तुळजापूरच्या अग्निशमन दलातील वाहनांची पूजा करून देविदास देवकते, मेघराज सिद्धगणेश, हर्षद क्षीरसागर, अजयरत्न सोनवणे, संजय बनसोडे, महावीर सुरते या कर्मचारी बांधवाचा सत्कार केला. यावेळी माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, पंडितराव जगदाळे, विजय कंदले, नरेश अमृतराव, भाजप तालुकाध्यक्ष आनंद कंदले, लखन पेंदे, रत्नदीप भोसले व सहकारी उपस्थित होते.

# ग्रामपंचायत निवडणुकीत तेरखेड्याचा कारभारी कोण होणार?

- गावात भावी सरपंच म्हणून झळकले फ्लेक्स
- चर्चेला उधाण
- आरक्षण ओबीसी महिला गटाला

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.४ मे -**

गावखेड्यातील मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंचपदासाठी आरक्षण सोडत नुकतीच तहसील कार्यालयात पार पडली आहे. ही आरक्षण सोडत २०३० पर्यंत वापरली जाणार आहे. त्यामुळे निवडणुकीचा मार्ग आता मोकळा झाला आहे, असेच म्हणावे लागेल. तालुक्यातील काही ग्रामपंचायतचा

कार्यकाळ पूर्ण होऊन बराच कालावधी उलटला असून त्याठिकाणी प्रशासक नेमण्यात आले आहे. तर काही ग्रामपंचायतांचा अल्प कालावधी राहिला आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोग निवडणुकीच्या तयारीला लागले आहे. यंदाची सरपंचपदाची आरक्षण सोडत अनेकांसाठी धक्कादायक ठरली. तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत समजल्या जाणाऱ्या तेरखेडा गावांमध्ये सरपंचपद ओबीसी महिला गटासाठी गेल्याने स्थानिक राजकीय नेत्यांच्या उमेदवारीचे मनसुबे धुळीस मिळाले. पाच वर्षांसाठी त्यांना ग्रामपंचायत राजकारणाच्या आराखड्याबाहेर रहावे लागणार असल्याने त्यांच्या पदरी घोर निराशा आली. जरी ग्रामपंचायती निवडणुका राजकीय पक्षाच्या चिन्हावर लढल्या जात नसल्या तरी,मात्र गावपातळीवर वेगवेगळ्या राजकीय पक्षाचे गट पाहायला मिळतात. तर यंदा 'गुलाल आपलाच हाय' गावचा सरपंच आमचा होणार म्हणत सोशल मीडियावर आशावादी नेत्यांच्या कार्यकर्त्यांनी आतापासूनच जोरदार प्रसिद्ध सुरू केलेली दिसत आहे. काहींनी तर आताच फ्लेक्स लावून स्वघोषित




भावी सरपंच म्हणून जाहीर केले असल्याने गावात चर्चेला उधाण आले आहे. दुसरीकडे आरक्षण सोयीचं ठरल्यामुळे उमेदवारांना सरपंचपदाची सरळ संधी मिळाली आहे. निवडणुकांसाठी काही महिने असले तरी मात्र आत्ताच नेत्यांच्या पळापळ सुरू झाल्या असून वातावरण चांगले ढवळून निघण्यास सुरू झाले आहे.

तालुक्यातील सर्वात मोठी तेरखेडा ग्रामपंचायत असल्याने यंदाची निवडणूक ही लक्षवेधी ठरणार असून गावचा गाव कारभारी कोण होणार? हे मात्र मतदार जनता ठरवणार.

## ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी यांनी घेतले तुळजाभवानी मातेचे दर्शन



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ मे -**

सलग तीन वेळा महाराष्ट्र केसरी हा किताब पटकवणारे आणि सध्या पोलीस उपायुक्त म्हणून कार्यरत असणारे प्रसिद्ध कुस्तीपटू विजय चौधरी यांनी आज श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. यावेळी पुजारी विशाल गंगणे यांनी त्यांची कुलधर्म कुलाचार पूजाअर्चा केली.

जळगावचे सुपुत्र असणाऱ्या विजय चौधरी यांनी २०१४ ते २०१६ या कालावधीत सलग ३ वर्षे महाराष्ट्र केसरीचा किताब मिळवला. त्यानंतर ते महाराष्ट्र पोलीस सेवेत सहायक आयुक्त या पदावर कार्यरत आहेत. आई भवानीमातेचा आशीर्वाद प्रेरणा देतो अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

दर्शनानंतर मंदिर संस्थान कडून त्यांचा देवीची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिर संस्थानचे जनसंपर्क अधिकारी गणेश निरवळ, दिनेश निकवाडे, अतुल भालेराव उपस्थित होते.

## ज्येष्ठ नागरिक मालमत्ता हक्क अभियान राबविण्यास सुरुवात

- जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मे -**

विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या परिपत्रकानुसार ज्येष्ठ नागरिक मालमत्ता हक्कांबाबत विशेष अभियान राबविण्यात येत आहे.

भारत सरकारच्या आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ व संबंधित २०१० मधील नियमांनुसार हा उपक्रम अमलात आणला जात आहे. या अधिनियमाचा मुख्य उद्देश म्हणजे ज्येष्ठ नागरिकांचे वृद्धापकाळात जीवन सुसह्य, सन्मानपूर्वक व तणावमुक्त व्हावे. हा आहे. कलम २ (७) नुसार,ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या नातेवाइकांना (पाल्यांना) वारसा किंवा स्व-अर्जित मालमत्ता हस्तांतरित केली असल्यास, त्या पाल्यांवर त्यांचे संगोपन करण्याचे दायित्व निश्चित केले गेले आहे. संगोपनास नकार देणाऱ्या पाल्यांविरोधात, कलम ५ नुसार, सक्षम प्राधिकाऱ्यांकडे तक्रार करता येईल. अशा प्रकरणांमध्ये कलम २३ अंतर्गत संबंधित मालमत्तेवर कारवाई होऊ शकते. या परिपत्रकाची वर्तमानपत्रे, सोशल मिडिया, तसेच गावांमध्ये दवंडी देऊन प्रभावी प्रसिद्धी करण्यात यावी, असे जिल्हाधिकारी किर्ती



किरण पुजार यांनी आदेशित केले आहे. नागरी क्षेत्रात मुख्याधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली व तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समित्या नेमण्यात याव्यात. या समित्यांनी वेळोवेळी आढावा बैठक घेत राहण्याचे निर्देश दिले आहेत. अभियान राबविताना कोणताही ज्येष्ठ नागरिक दुर्लक्षित राहू नये व त्यांचे हक्क अबाधित राहावेत, याची दक्षता घेण्यात यावी, असेही जिल्हाधिकारी पुजार यांनी स्पष्ट केले आहे.

## धाराशिवमध्ये आर्चरी, जिम्नॅस्टीक्स व कबड्डीसाठी स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मे -**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्या वतीने जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रातर्फे आर्चरी,जिम्नॅस्टीक्स व कबड्डी या खेळांचे स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर २० मे या कालावधीत सकाळी ६ ते ८ आणि सायंकाळी ५ ते ७ या वेळेत घेण्यात येणार आहे.

प्रशिक्षणासाठी पुढील मार्गदर्शक नेमण्यात आले आहेत. शुभांगी रोकडे जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, धाराशिव, डिंपल ठाकरे (जिम्नॅस्टीक्स) शरद पवार हायस्कूल, बार्शी नाका, धाराशिव, विश्वास खंदारे (कबड्डी) गांधी विद्यालय, चिखली यांचेशी संपर्क साधावा.

व जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडू व विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

## आदर्श शिक्षक मुलानी; आदर्श शाळा पुरस्काराने जि.प. बारूळ शाळेला पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ मे -**

विज्ञान पदवीधर शिक्षक अमिन मुलाणी यांना आदर्श शिक्षक व जिल्हा आदर्श शाळा पुरस्काराने बारूळ जि.प. शाळेला उत्कृष्ट शाळा पुरस्काराने सन्मानित जिल्हा परिषदे कडून देण्यात येणारे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनी करण्यात आले.



जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारांमध्ये जिल्हाभरातून प्राथमिक व माध्यमिक असे एकूण ३४ आदर्श शिक्षक पुरस्कार, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा पुरस्कार, आदर्श शाळा व्यवस्थापन समिती पुरस्कार, उत्कृष्ट शाळा पुरस्कार, माझा वर्ग माझी जबाबदारी पुरस्कार, वितरणाचा कार्यक्रम जिल्हा परिषदेच्या माध्यमातून परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक, जिल्ह्याचे खासदार ओमप्रकाश पवनराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांच्या हस्ते तर शिक्षणाधिकारी (मा) सुधा साळुंके, शिक्षणाधिकारी प्रा. अशोक पाटील, डायटचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत एक मे या महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून धाराशिव येथील स्वयंवर मंगल कार्यालयात दुपारी २ वाजता शेकडो शिक्षक, संघटना पदाधिकारी व समर्थकांच्या उपस्थितीत सन २०२२ ते २३ पासून म्हणजे गत तीन वर्षापासून रखडलेला आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. उत्कृष्ट शाळा पुरस्कार म्हणून जिल्हा परिषद बारूळ शाळेला सन्मानित करण्यात आले.

तसेच जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारात प्राथमिक विभागात बार्शी तालुक्यातील कारी गावचे रहिवासी असलेले मात्र तुळजापूर तालुक्यात बारूळ येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विज्ञान पदवीधर पदावर कार्यरत असलेले अमिन जहिरुद्दीन मुलाणी यांना सन २०२३-२४ या वर्षीच्या जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने मान्यवराच्या हस्ते शाल, फेटा, सन्मानचित्र, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

अमिन मुलाणी यांना जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार व शाळेला उत्कृष्ट शाळा पुरस्कार मिळाल्याने दुग्ध शर्करायोग साधून आल्याने सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

## खामसवाडीच्या शेतकऱ्याचे ऊस पीकासह ठिबक जळाल्याने लाखोचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**खासमवाडी, दि.४ मे -**

कळंब तालुक्यातील शेतकरी सारंग प्रकाशराव जोशी यांच्या शेत गट नंबर २६९ मधील ९९ आर ऊस आगीत जळाल्याने ऊस पीक त्यातील ठिबक संच, पाईपलाईन, केबल वायर आदी जळून खाक झाले.

**नुकसान भरपाई देण्याची मागणी...**

घटनेची माहिती मिळताच महसूल पथकातील तलाठी व त्यांच्या टीमने सदरील शेतातील ऊस पिकाचा व ठिबक संच, पाईपलाईन, केबल वायर सर्व जळालेल्याचा रीतसर पंचनामा केला.

यावेळी तिनं ते साडेतीन लाख रुपयाचे अंदाजित नुकसान झाल्याचे कळते.

सदरील आगीचे स्पष्ट कारण समोर आले नाही मात्र एका अज्ञात व्यक्तीने बांध पेटवल्याने आग लगल्याचे बोलले जाते असं पंचनामा करताना स्पष्ट झाले. सदरील ऊस पिक हे चार महिने वयाचे असल्याने शेतकऱ्यातून नुकसानीबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे.सदरील नुकसानग्रस्त शेतातील पंचनामा महसूल टीमने केला मात्र पोलीस पंचनामा राहिला होता.

पोलीस पंचनामा झाल्यावरच पुढील तपास होणे बाकी आहे. भर उन्हाळ्यातच अशी दुर्दैवी घटना घडल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

# जेवळीत रंगला कुस्तीचा आखाडा; पै. भुजबळ ठरले केसरीचे मानकरी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.४ मे -**

लोहारा तालुक्यातील जेवळी येथील ग्रामदैवत महात्मा बसवेश्वरांच्या यात्रेनिमित्य आयोजित कुस्ती स्पर्धेत पै. जिवन भुजबळ (वाडी वडगाव) यांनी एकवीस हजार व दोन किलो चांदीच्या गदेसाठीची अंतिम कुस्ती जिंकून बसव केसरीचा मान पटकाविला. यावेळी कुस्ती पाहण्यासाठी परिसरातील कुस्ती शौकिनांची मोठी गर्दी केली होती. तीन दिवसापासून सुरु असलेल्या यात्रेचा समारोप शुक्रवारी (ता.२) कुस्त्याच्या दंगलीने झाला.

यावेळी या कुस्ती फडाचे उद्घाटन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मोहन पणुरे यांच्या हस्ते झाले. यावेळी युवा नेते सत्यम चौगुले, महाराष्ट्र चॅम्पियन पै. धनराज भुजबळ, उस्ताद अरुण हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या परिसरात ही यात्रा मोठ्या स्वरूपात भरवली जाते. कुस्ती ही या यात्रेचे मुख्य अकर्षन असते.

माजी मुख्याध्यापक बी.एम. बिराजदार यांच्या वतीने ठेवण्यात आलेले पंचवीस हजार रुपये व चांदीच्या गदेसाठीची अंतिम कुस्ती ही जीवन भुजबळ (वडगाव वाडी) विरुद्ध तुकाराम महानवर (लातूर) अशी झाली. यात जीवन भुजबळ यांनी बाजी मारत बसव केसरीचा मान पटकाविला. तर कमिटीच्या वतीने ठेवण्यात आलेल्या पंधरा हजार रुपयांसाठीची द्वितीय कुस्ती ही पवन भुजबळ (वाडी वडगाव) विरुद्ध आनंद वायकुळे (हातलाई) यांच्यांत झाली. यात पवन भुजबळ यांनी बाजी मारली. या बरोबरच यावेळी सायंकाळी पाच ते रात्री नऊ पर्यंत प्रकाश झोतात अनेक लहान मोठ्या कुस्त्या पार पडल्या. या कुस्तीचे समालोचन गोविंद घारगे यांनी केले आहे. यानंतर येथील बसव मंचावर या यात्रेनिमित्त देवस्थान कमिटीच्या वतीने जेवळी येथील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना दिले जाणारा बसवरत्न पुरस्कार आमदार प्रवीण स्वामी यांच्या उपस्थितीत देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी दत्तात्रय मडोळे (आदर्श पोलीस), महेश ढोबळे (उत्कृष्ट अभियंता), सिद्धी धरणे (संशोधन), महादेव व धनराज शिंदखेडे बंधू (उद्योजक), नीलकंठ माणिकशेट्टे (सामाजिक), आर.व्ही. पाटील (आदर्श शिक्षक), अविनाश दांडेकर (प्रेरणादायी व्यक्तिमत्व), रामचंद्र साळुंखे (साहित्यिक) व अभिजीत पाटील (अभियंता, आदर्श शेतकरी) यांना बसवरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी यात्रा कमिटीचे अध्यक्ष बसवराज कारभारी उपाध्यक्ष महादेव मोघे सचिव मल्लिनाथ डिग्गे शिवशरण कारभारी, गुंडाप्पा कारभारी, सुभाष सारणे, बाळासाहेब कटारे, महादेव सारणे आदीसह नागरिक उपस्थित होते. यावेळी येथील महात्मा बसवेश्वरांच्या मंदिरास शुक्रवारी (ता.२) धाराशिव जिल्हाधिकारी डॉ. कीर्तीकिरण पुजार,



आमदार प्रवीण स्वामी, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनष घोष, उपविभागीय अधिकारी गणेश पवार, तहसीलदार रणजीतसिंह कोळेकर यांनी भेट देऊन यात्रा काळातील सोयी सुविधाचा आढावा घेतला. दरम्यान गुरुवारी (ता.१) रात्री छबिन्याची मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकीत विविध कलापतकासह विविध देखावे (सोंग) सादर करण्यात आले होते. यानंतर मंदिरापुढील मैदानावर शोभेचे दारु काम पार पडले. यावेळी आतषबाजी पाहण्यासाठी परिसरातील नागरी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.




## सीएमएफ फोन २ प्रोची विक्री ५ मेपासून

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- नथिंग या लंडनस्थित तंत्रज्ञान कंपनीच्या सीएमएफ या सबब्रँडने त्यांच्या सीएमएफ फोन २ प्रोची विक्री ५ मे रोजी दुपारी १२ वाजल्यापासून फ्लिपकार्ट, फ्लिपकार्ट मिनिट्स, विजय सेल्स, क्रोमा आणि भारतातल्या सर्व आघाडीच्या रिटेल स्टोअर्समध्ये सुरू होणार असल्याची घोषणा केली आहे. पहिल्या दिवशी खास सादरीकरणाची ऑफर म्हणून फोन २ प्रो रु. १६,९९९ (सर्व ऑफर्ससहित) इतक्या कमी किमतीला उपलब्ध असणार आहे. सीएमएफ बाय नथिंगने २८ एप्रिल २०२५ रोजी फोन फोन २ प्रो जागतिक बाजारपेठेत सादर केला. या गटातील सर्वोत्तम कॅमेरा, अप्रितम ब्राइट डिस्प्ले आणि प्रीमिअम डिझाइन असलेला सीएमएफ फोन २ प्रो हा दैनंदिन वापरासाठीचा उत्कृष्ट स्मार्टफोन आहे.

## मोबिल १ ब्रँडसह ड्रायव्हर्सना अनफर्गेटेबल जर्नीवर नेले

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- एक्सॉनमोबिल ल्युब्रिकण्ट्स प्रा. लि. या भारतातील मोबिल ब्रॅण्डेड ल्युब्रिकण्ट्सची विक्री करणाऱ्या एक्सॉनमोबिल सहयोगी कंपनीने आज त्यांच्या सुरू असलेल्या अनफर्गेटेबल जर्नी मोहिमेचा भाग म्हणून नवीन जाहिरातीच्या लाँचची घोषणा केली. या जाहिरातीमध्ये जगातील आघाडीचा सिन्थेटिक इंजिन ऑईल ब्रँड मोबिल १ वर विशेष प्रकाश टाकण्यात आला आहे. बॉलिवुड आयकॉन ऋतिक रोशन असलेली ही जाहिरात ऋतिकची ड्रायव्हिंग, ड्रिमर्स व डूअर्सचा देश म्हणून भारत आणि मोबिल १ ची कार्यक्षमता यांमधील शक्तिशाली समन्वयाला सादर करते, जेथे या सर्व बाबी समान आवड आणि सर्वोत्तमतेसाठी निरंतर प्रयत्नाद्वारे एकत्रित आल्या आहेत.

## ओपिनियन ट्रेडिंग प्लॅटफॉर्म वर व्यवहार करण्याविरुद्ध जनतेला खबरदारीचा इशारा

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाच्या निदर्शनास आले आहे की ओपिनियन ट्रेडिंग प्लॅटफॉर्म म्हणून ओळखले जाणारे काही प्लॅटफॉर्म त्यांच्या यूजर्स/सहभाग्यांना अशा व्यवस्थेत ट्रेड/प्रवेश करण्यासाठी एक प्लॅटफॉर्म देतात जिथे पेआउट अंतर्निहित घटनेच्या हो/नाही प्रस्तावाच्या परिणामावर अवलंबून असते. काही प्रकरणांमध्ये, ओपिनियन ट्रेडिंग प्लॅटफॉर्म अशा प्रकारे डिझाइन केले जातात की ते इन्वेस्टमेंट प्लॅटफॉर्मसारखे दिसतात कारण ते प्रॉफिट, स्टॉप लॉस, ट्रेडिंग इत्यादी संज्ञा/शब्द वापरतात, जे सिक्युरिटीजमधील ट्रेड्स सह संबंधित आहेत.

वरील गोष्टी लक्षात घेता, गुंतवणूकदारांना हे लक्षात ठेवण्याचा सल्ला दिला जातो की सर्वसाधारणपणे, ओपिनियन ट्रेडिंग सेबीच्या नियामक कार्यक्षेत्रात येत नाही, कारण जे ट्रेड केले जातात ते सिक्युरिटी नाहीं. गुंतवणूकदार/सहभागींनी हे लक्षात ठेवले पाहिजे की अशा गुंतवणूक/सहभागासाठी सिक्युरिटीज मार्केट कार्यक्षेत्रात कोणतीही गुंतवणूकदार संरक्षण यंत्रणा उपलब्ध असणार नाही.




## 'बंजारा' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- सिक्कीमच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर चित्रीत झालेल्या 'बंजारा' चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून, या ट्रेलरमध्ये तीन मित्रांचा भावनांनी भरलेला आणि रहस्यांनी गुंतलेला प्रवास उलगडताना दिसतो. १६ मे रोजी प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाने प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवली आहे. टीझरमध्ये या तिघांच्या प्रवासाची झलक दाखवण्यात आली होती, पण ट्रेलरमध्ये हा प्रवास नेमका कशासाठी सुरू होतो, याचे धागेदोरे उलगडताना दिसत आहे. समीरच्या आजोबांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांचे अस्थी विसर्जन करण्यासाठी हे तीन मित्र सिक्कीमकडे निघतात. मात्र, तिथे पोहोचल्यानंतर त्यांच्या वाट्याला एक अनपेक्षित आणि थरारक अनुभव येतो. जो त्यांच्या मैत्रीत, आयुष्यात आणि आत्मशोधात एक मोठा बदल घडवतो. पण तो अनुभव नेमका काय आहे? हे चित्रपट बघितल्यावरच कळेल. चित्रपटातील सिक्कीमचे अप्रतिम लोकेशन्स आणि दोन पिढ्यांतील मित्रांची भन्नाट केमिस्ट्री या चित्रपटाला खास बनवते.

# अजिंठा घाटात ट्रकचे ब्रेक निकामी झाले असता ट्रक रस्त्यावर आडवा झाला




फर्दापूर दि.४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावरील अजिंठा घाटात ब्रेक निकामी होऊन मालवाहतूक ट्रक पलटी झाल्याची घटना रविवारी दि.४ दुपारी ३ वाजेच्या सुमारास घडली.यादरम्यान,सुमारे पाच तास वाहनधारकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. आंध्रप्रदेश मधील विजयवाडा येथून नारळ घेऊन गुजरात येथे जाणारा मालवाहतूक ट्रक (एपी.१६ टीजे ६३१८) दुपारी ३ वाजेच्या सुमारास अजिंठा घाट उतरत त्याचे ब्रेक निकामी झाले.ही बाब चालकाच्या लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान राखत अनियंत्रित झालेला ट्रक डोंगराच्या दिशेला धडकल्याने रस्त्यावर आडवा झाला.सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.मात्र,यामध्ये ट्रकचे अतोनात नुकसान झाले.

सुमारे पाच तास वाहतूक कोंडी झाल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.यामुळे वाहनचालक व प्रवाशांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागला. या अपघात ट्रकचालक जगन एन गरखा (विजयवाडा,आंध्रप्रदेश) आणि सहकारी किरकोळ जखमी झाले.

**छोट्या वाहनधारकांना करावा लागला पर्यायी मार्गाचा अवलंब :**

यादरम्यान,छोट्या चारचाकी वाहनधारकांना घाट जाम असल्यामुळे सोयगाव - हळदा- उंडणगाव - गोळेगाव मार्गे छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने जावे लागले.यादरम्यान जळगाव येथून छत्रपती संभाजीनगरला पेशंट घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेला ही या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.रुग्णवाहिकेलाही पर्यायी रस्त्याने रुग्णालय गाठावे लागले.

**पर्यटकांना पायी चालत गाठवी लागली अजिंठा लेणी :**

अजिंठा लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या बँगलोर येथील पर्यटकांना या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.दुपारच्या वेळेस भर उन्हात २ किलोमीटर पायी चालत अजिंठा लेणी गाठावी लागली.

## ग्रामपंचायत फारोळा कंपोस्ट खड्डा भरु आपले गाव स्वच्छ ठेवू अभियान

बिडकीन दि.४ (प्रतिनिधी)- पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे कंपोस्ट खड्डा भरू आपले गाव स्वच्छ ठेवून अभियान शुभारंभ करण्यात आला यावेळी उपस्थित देविदास.गवळी विस्तार अधिकारी तथा स्वच्छ भारत कक्ष प्रमुख पंचायत समिती पैठण, बळीराम राठोड विस्तार अधिकारी पैठण, आर.डि.चौधरी विस्तार अधिकारी पं.स.पैठण,करूणा फुलझेले,अनीता काळे, सरपंच सलीम पठाण, ग्रामपंचायत अधिकारी आशा तुपे, उपससपंच शितल चाव्हरे,कमल गोरे, पल्लवी गोरे,सरला पोपळघट, विष्णू पोपळघट,तमीजाबी पठाण,इलीयास पठाण, जाधव सर, नवनाथ धरपळे,रविंद्र गोरे,संदिप चाव्हरे,दिलीप गोरे, गणेश गायकवाड,तेजस जाधव, संजय धुमाळ, रविंद्र पवार, मंगेश धुमाळ मोठ्या संख्येने गावकरी आदिंची उपस्थित होते.




## फर्दापूर पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक सुग्रीव चाटे प्रशास्तीपत्र देऊन गौरविण्यात आले


फर्दापूर दि.४ (प्रतिनिधी)- फर्दापूर पोलिस स्टेशन चे उल्लेखनीय कामगिरी केलेल्या उपनिरीक्षक सुग्रीव चाटे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले



फर्दापूर पोलिस स्टेशन चे उपनिरीक्षक सुग्रीव चाटे यांनी मागील गुन्हात गु र नं ३७ .२०२५ कलम २८१,१२५,३२४,बि एन एस ४१ या गुन्ह्याचा तपास फक्त दोन दिवसात पूर्ण करून मा. कोर्टात दोषारोपपत्र दाखल केले आहे यामुळे छत्रपती संभाजीनगर पोलिस अधीक्षक ग्रामीण कार्यालय यांनी यांच्या कामाची तत्परता पाहून तसेच उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाचे नावलौकिक होऊन जनतेचा आदर वाढला आहे यावेळी पोलीस अधीक्षक डॉ विनय कुमार राठोड अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह यांनी उपनिरीक्षक सुग्रीव साठे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

## संघ हीच जीवनगाथा

अलकः- (१०८) साध्यं-सिद्ध- सिद्धता



विजयाशमीच्या सुमुहुर्तावरसंघ स्थापन झाला तेव्हापासून आजतागायत संघाचे अनेक क्षेत्रात म्हणजे बौद्धिक - नैतिक धार्मिक सामाजिक- शारीरिक- राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात सिमोल्लंघन प्रयत्नपूर्वक झालेआहे. उदाः- व्यक्तिगत जीवनातून- समष्टी जीवनाकडे; दास्याकडून- स्वातंत्र्याकडे; निद्रेतून जागृती कडे; दैन्यातून- समृद्धीकडे ; दौर्बल्ल्यातून - सशक्तीकरणाकडे असे सिमोल्लंघन झाले. मोठ्या प्रमाणावर जनजागरण झाले. गरजेनुसार साध्यं- सिद्धं- सिद्धता झाली आहे.

आजसुद्धा प्रतिवर्षी विजयादशमीला

ठेवुनी चेहरा हसरा। दुःख सगळे विसरु या. ।या सोनियाचा दिनी ही शपथ घेऊ या।

विः - विजय मिळवूनी षड्रिपूंवरी।
जः- जय मिळवू या मनावरी ।।
याः- यातना कितीही झाल्या तरी।
दः- दररोज एक नियम पाळू या।
शः- शरणागत होऊ श्रीरामचरणी।
मीः- मी पणा दूर सारु या।।
श्रीराम जय राम जयजयराम ।। भारत माता की जय ।।
।। वंदे मातरम् ।। क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती




## बुलढाणा अर्बन संस्थेच्या वडोद बाजार शाखेच्या वतीने पीएसआय संजय गवई, सरपंच गोपाल वाघ मयत कर्जदार वारसास नुकते यांच्या हस्ते धनादेशाचे वाटप

सोयगाव दि.४ (प्रतिनिधी)- सहकार्याला सामाजिक कार्याची जोड देऊन समाजातील विविध उपेक्षित घटकांच्या आर्थिक सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी सदैव तत्पर असणाऱ्या बुलढाणा अर्बन संस्थेच्या वडोद बाजार शाखेच्या वतीने मयत कर्जदार जनार्दन हरिभाऊ साबळे यांच्या वारसास नुकतेच त्यांना धनादेशाचे वितरण करण्यात आले बुलढाणा अर्बन संस्थेच्या वदोड बाजार शाखेचे सभासद स्वर्गीय जनार्दन हरिभाऊ साबळे यांचा दि.२३/११/२०२४ रोजी वाळूज परिसर छत्रपती संभाजी नगर येथे ४०७ वाहनाचा अपघात होऊन त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला त्यांनी शाखा वडोद बाजार येथून सोने तारण कर्ज रुपये १२१०००/- रु घेतले होते.

बुलढाणा अर्बन संस्थेच्या वतीने ठेविदार व कर्जदार यांना अपघाती विम्याचे संरक्षण देण्यात येते या संदर्भात स्वर्गीय जनार्दन हरिभाऊ साबळे यांच्या कुटुंबाची विभागीय व्यवस्थापक संजय दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली भेट घेऊन शाखा व्यवस्थापक गजानन नवले यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव मुख्यालयाकडे सादर केली होती.सदर विमा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर संस्थेच्या शाखा वडोद बाजार कार्यालयास एक छोटेखानी कार्यक्रमात पीएसआय संजय गवई,शाखेचे प्रतिष्ठित सभासद उपसरपंच गोपाल वाघ,गोविंद पांडे,दादासाहेब काळे,यांच्या चौघांच्या हस्ते वारसदार लताबाई जनार्दन साबळे यांना १२९४९१/-रुपया चा धनादेश वितरित करण्यात आला.यावेळी विभागीय व्यवस्थापक संजय दळवी,सुभाष जैन,(संचालक) सभासद शिवाजी पथ्रिकर, सांडू घुले,अनिल वाघ,सखाराम कोलते,आत्माराम कोलते, भुजंगराव साबळे,रामकृष्ण वाघ व शाखा व्यवस्थापक गजानन नवले,स.शाखा व्यवस्थापक राजेन्द्र जोशी,किशोर पाटील,अजय दांडगे,शाखा शिपाई श्रीपाल ताठे हे सर्व उपस्थित होते

# खरीप हंगामाआधी आमदार प्रशांत बंब यांचे कृतीचे रणशिंग

## बियाणे, खते, पिककर्ज व वीज पुरवठ्यावर गंगापुरात आज महत्त्वपूर्ण बैठक

गंगापुर दि.४ (प्रतिनिधी)- खरीप हंगाम २०२५ तोंडावर असताना शेतकऱ्यांना बियाणे, खते, पिककर्ज तसेच विजपुरवठा या बाबतीत कोणत्याही अडचणींना सामोरे जावे लागू नये, यासाठी आमदार प्रशांत बंब यांनी पुढाकार घेत गावपातळीवरील प्रशासकीय यंत्रणेला जागे केले आहे.

सोमवारी ( दि. पाच) दुपारी ४ वाजता शिवकृपा मंगल कार्यालय, गंगापुर येथे महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत कृषी, विद्युत (महावितरण), महसूल, पंचायत समिती तसेच बँक क्षेत्रातील प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार आहेत.



आमदार बंब यांनी गंगापुर व खुलताबाद तालुक्यातील सर्व सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांना आवाहन केले आहे की, आपल्या गावातील शेतकरी व ग्रामस्थ यांना येणाऱ्या अडचणी गावपातळीवर जाणून घेऊन, त्या अडचणींची लेखी माहिती घेऊन बैठकीला स्वतः उपस्थित राहावे. त्यांनी डवंडी तसेच व्हॉट्सअॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम अशा समाजमाध्यमांचा वापर करून अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवावी, असे स्पष्ट केले. महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्याच्या समस्या, बँकांकडून मिळणाऱ्या पिककर्जात अडचणी, खते-बियाण्यांच्या वेळेवर उपलब्धतेचा अभाव यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे या सर्व समस्या एकाच व्यासपीठावर मांडून त्यावर उपाययोजना करण्यात येणार आहेत. आमदार बंब यांनी स्पष्ट केले की, "शेतकऱ्यांचे प्रश्न वेळेत सोडविणे ही आपली जबाबदारी आहे. खरीप हंगामात अडथळे येऊ नयेत यासाठी आपण सर्वांनी सजग राहिले पाहिजे. शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी गावाच्या प्रतिनिधीपर्यंत पोहोचवाव्यात आणि गावपातळीवरील प्रतिनिधींनी त्या अडचणी घेऊन वेळेत बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार बंब यांनी केले आहे.

> शेतकऱ्यांच्या अडचणी हा केवळ शेतकऱ्यांचा प्रश्न नाही, तर तो आपला सामूहिक प्रश्न आहे. खरीप हंगामात कोणतीही अडचण उद्भवू नये यासाठी शासनाच्या प्रत्येक यंत्रणेला जागे करणे हे आपले कर्तव्य आहे. बियाणे, खते, पिककर्ज आणि वीजपुरवठा या सर्व समस्या एका व्यासपीठावर मांडून त्यावर तात्काळ उपाययोजना करणं हेच खरे जनतेच्या सेवेचं प्रतिक आहे. गावपातळीवरील प्रत्येक प्रतिनिधीने सजग राहून शेतकऱ्यांचा आवाज व्यवस्थेपर्यंत पोहोचवावा. कारण, शेतकऱ्यांचे प्रश्न वेळेत सोडवणं म्हणजेच त्यांच्या भविष्याचा विचार करणं होय..
>
> **- प्रशांत बंब**
> (आमदार, गंगापूर- खुलताबाद)

## महापुरुषांच्या विचारांचे आचरण हीच खरी मानवंदना : शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती

अ.नगर दि.४ (प्रतिनिधी)- आपल्या महाराष्ट्राला महापुरुषांच्या मार्गदर्शक विचारांचा अनमोल वारसा लाभलेला आहे. त्यामुळे आपल्या राज्याने विविध क्षेत्रात आपले भक्कम स्थान निर्माण केलेले आहे. महापुरुषांना अभिवादन करताना त्यांच्या विचारांचे आचरण हीच खरी त्यांना दिलेली मानवंदना आहे, असे प्रतिपादन शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांनी केले.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त भिंगार येथील पंचशील प्रतिष्ठानने डीजे - ध्वनीक्षेपकाचा अनावश्यक खर्च टाळून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. या पर्यावरणपूरक व कौतुकास्पद उपक्रमाबद्दल येथील हरीभूमी प्रतिष्ठानच्यावतीने पंचशील प्रतिष्ठानचे सागर चाबुकस्वार यांचा शहर विभागाचे पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांचे हस्ते पर्यावरण मित्र सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला, त्यावेळी श्री भारती बोलत होते. पंचशील प्रतिष्ठानने राबविलेल्या ध्वनी प्रदूषण व डीजेमुक्त अभिवादन उपक्रमाचे इतर मंडळांनी अनुकरण करावे असे आवाहन यावेळी श्री भारती यांनी केले.

यावेळी हरिभुमी प्रतिष्ठानचे अभय ललवाणी म्हणाले की, सागर चाबुकस्वार व त्यांच्या सहकाऱ्यांनी डीजे ध्वनिक्षेपकाचा अनावश्यक खर्च टाळून शालेय विद्यार्थ्यांना केलेली मदत ही निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांचे हे प्रेरणादायी कार्य समाजापुढे यावे म्हणून त्यांना हे पर्यावरण मित्र सन्मानपत्र व पुष्पगुच्छ शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांच्या हस्ते प्रदान करण्यात येत आहे. यामुळे इतरांनाही प्रेरणा मिळेल असे मत यावेळी उल्हास नांगरे यांनी व्यक्त केले.

## आंबा फळांचा जाहिर लिलाव

शासकीय फळरोपवाटिका व तालुका बीज गुणन केंद्र, नरसिंगपुर ता. कन्नड येथील प्रक्षेत्रावरील रायवळ आंबा फळांचा जाहिर लिलाव दि.०६/०५/२०२५ वार मंगळवार रोजी दुपारी २.३० वाजता कृषि चिकित्सालय व फळरोपवाटिका ता. कन्नड येथे ठेवण्यात आलेला आहे. सदरील लिलावामध्ये भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रु. ५००००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार रुपये मात्र) लिलावाच्या दिवशी सकाळी ९.०० ते दुपारी १.३० वाजेपर्यत कार्यालयात रितसर जमा करुन पोहच घ्यावी दुपारी १.३० वाजे नंतर आलेली अनामत रक्कम स्वीकारली जाणार नाही व लिलावात भाग घेता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

तरी इच्छुक खरेदीदारांनी लिलावास सहभागी व्हावे. लिलावाच्या अटी व शर्ती कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुटटीचा दिवस वगळून पाहण्यास मिळतील, लिलावाची अपेक्षित रक्कम न आल्यास लिलाव रदद करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवले आहे.

स्थळ - कृषि चिकित्सालय व फळरोपवाटिका,
नरसिंगपुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

**कृषि अधिकारी**
**कृषि चिकित्सालय व फळरोपवाटिका,**
**नरसिंगपुर ता. कन्नड**

**उपविभागीय कृषि अधिकारी**
**सिल्लोड ता. सिल्लोड**

## रोखठोक

दिनेश गुणे

# सेवा पंधरवड्याच्या मागे आणि पुढे

पंतप्रधानपदाची सूत्रे होती घेतल्यानंरच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनी नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून देशवासीयांना उद्देशून केलेल्या पहिल्या भाषणात सरकारी यंत्रणांना एक इशारावजा संदेश दिला होता. यापुढे कामकाजात 'चलता है'; संस्कृती खपवून घेतली जाणार नाही, 'मला काय त्याचे' ही त्रयस्थ भावनाही चालणार नाही आणि कार्यक्षमता दाखविता येत नसेल तर अशा कर्मचाऱ्यांनी सरळ बाजूला व्हावे, असा तो खरमरीत इशारा जेव्हा मोदी यांनी दिला, तेव्हा देशातील तमाम नोकरशाहीला आपल्या कर्तव्यांची, जबाबदारीची, संस्कारांची आणि कार्यसंस्कृतीची बहुधा प्रथमच आठवण झाली होती. पुढे काही दिवस सरकारी कार्यालयांच्या कामकाजात कमालीची शिस्त आली. वेळेवर कार्यालयात दाखल होणे, ठरलेल्या वेळेत कामाचा निपटारा करणे, जनतेच्या कोणत्याही कामासाठी खेटे घालण्याची वेळ येणार नाही याची काळजी घेणे आणि सरकारी कर्मचारी हा जनतेचा सेवक आहे या भावनेने काम करणे हे आपले कर्तव्य, जबाबदारी आणि असे सारे काही आहे, या जाणिवा जाग्या झाल्या होत्या. असे काही काळ चालले, पण आता त्याला जवळपास दहा वर्षे उलटून गेली आहेत. गेल्या दहा वर्षांत कार्यसंस्कृतीच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्याने कार्यसंस्कृती नावाच्या शिस्तीचा निचरा होऊन गेल्याचा जुना अनुभव जनमानसात नव्याने जिवंत झाला आहे आणि 'सरकारी काम म्हणजे वाट बघत थांब' ही म्हण पुन्हा एकदा जनतेच्या अंगवळणी पडू लागली आहे. कोणत्याही सरकारी कार्यालयांच्या आवारात कार्यालयाचे कामकाज सुरू होण्याआधीच गोळा होणारी गर्दी, सराईतांची धावपळ, केविलवाण्या चेहऱ्याने आपला नंबर येण्याची प्रतीक्षा करणारे हतबल सामान्य नागरिक आणि कामकाज सुरू करण्याची वेळ उलटून गेल्यानंतरही कार्यालयांतील दालनात अधिकाऱ्याच्या प्रतीक्षेत असलेल्या रिकाम्या खुर्च्या हे जुने दृश्य आता सर्रास दिसू लागले आहे. सरकारी कामकाजाचा खाक्या माहीत असलेला एक सराईत वर्ग जनसामान्यांतदेखील असतो. त्याला हे दृश्य सवयीचे असते, पण सहसा अशा कार्यालयांची पायरी न चढणारी व्यक्ती पंतप्रधानांच्या त्या इशाऱ्यावर विश्वास ठेवून काही अपेक्षेने कार्यालयांत जाते, तेव्हा बऱ्याच ठिकाणी हेच दृश्य पाहण्याचा प्रसंग त्याच्यावर ओढवत असेल, तर त्याची सरकारी कामकाजाविषयीची भावना कशी होत असेल याची कल्पना करणे फारसे अवघड नाही.

कदाचित म्हणूनच, महाराष्ट्राच्या सरकारी कार्यसंस्कृतीला शिस्त लावण्यासाठी दहा वर्षांपूर्वी, २८ एप्रिल २०१५ या तारखेपासून महाराष्ट्रात एक नवा कायदा अस्तित्वात आला. राज्यातील नागरिकांना राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबद्ध पद्धतीने प्राप्त व्हाव्यात यासाठी तत्कालीन व आजचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व पाठपुराव्यातून या कायद्याचा जन्म झाला आणि या कायद्याने सामान्य नागरिकांना सरकारी सेवा मिळविण्याचा हक्क बहाल केला. गेल्या २८ तारखेला, जेमतेम आठवडाभरापूर्वी या कायद्याचा दशकपूर्ती सोहळाही राजधानी मुंबईत पार पडला आणि पुन्हा एकदा सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये सेवाभावाची जाणीव जागी करण्यासाठी सेवा पंधरवडाही जाहीर करण्यात आला. खरे म्हणजे, सरकारी कर्मचारी त्याच्या कर्तव्याच्या काळात सदैव सेवातत्परच असला पाहिजे, असे कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीची आचारसंहिता सांगते. त्यामुळे एखादा विशिष्ट पंधरवडा जाहीर करून त्या कालावधीत नागरिकांना सुलभतेने सेवा देण्याची सरकारी मोहीम राबविण्याची वेळ येते, तेव्हा अन्य काळातील कार्यसंस्कृतीचे पितळ आपोआपच उघडे पडत असते.

सरकारी कर्मचारी हा कर्तव्यपूर्तीसाठी नागरिकांना उत्तरदायी असतो, नागरिकांची सेवा करणे ही त्याची कर्तव्ये आणि जबाबदारी असते, असे हा क्रांतिकारी कायदा स्पष्ट करतो. शासनाच्या सेवा सामान्य माणसास सहजपणे उपलब्ध होत नाहीत अशी सातत्याने होत असलेली तक्रार दूर करण्यासाठी अशा कायद्याची गरज असल्याचे सरकारचे मत होते. या परिस्थितीत बदल व्हावा आणि नागरिकांना कालमर्यादेत सुलभ आणि तत्पर सेवा निरपेक्षपणे दिली जावी अशी या कायद्याची कर्मचाऱ्यांकडून अपेक्षा आहे. विशेष म्हणजे, त्याआधी सन २००५ मध्ये अशाच उद्देशाने एक कायदा तयार करण्यात आला होता. दप्तरदिरंगाई हा सरकारी कामकाजाचा पठडीबाज खाक्या असल्याने कामे खोळंबतात आणि ती पूर्ण करून घेण्यासाठी नागरिकांना कार्यालयांत वारंवार खेटे घालावे लागतात. या काळात त्यांना आणखीही जे काही करावे लागते, त्यामध्ये 'वजन' ठेवणे ही बाब सामान्यांनाही ठावूक असते. एवढे करूनही कामे वेळेवर होत नसल्याच्या अनुभवाने हताश दिसणारे अनेक चेहरे कार्यालयांच्या आवारात आधाराच्या शोधात वणवण करत असतात. ही परिस्थिती टाळावी यासाठी २००५ मध्ये तयार करण्यात आलेला दप्तरदिरंगाईविरोधी कायदा फारसा प्रभावी ठरला नाही, हे लक्षात आल्याने नागरिकांनाच सेवा मिळविण्याचा हक्क प्रदान करणारा कायदा करावा असे तेव्हा फडणवीस सरकारने ठरविले. आता पुन्हा फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात महायुतीचे सरकार सत्तेवर असल्याने, सेवा हक्क कायद्याचा आणि त्याच्या अंमलबजावणीचा मागोवा घेण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. या कायद्याच्या दशकपूर्ती निमित्ताने जाहीर करण्यात आलेला सेवा पंधरवडा सध्या राज्याच्या सर्व सरकारी कार्यालयांत सुरू आहे, याची जाणीव जनतेस व्हावी, सेवा मिळविण्याचा हक्क बजावण्यासाठी या पंधवड्यात तरी जनतेने जागरूकपणे पुढे यावे, हा या पंधरवड्यातील मोहिमेचा उद्देश असावा. म्हणूनच, एकूणच सरकारी कार्यालयांतील कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीचा आणि कार्यशैलीची चौकट आखण्याच्या प्रयत्नांचा मागोवा घेणे गरजेचे आहे.

सेवा हक्क कायद्याच्या अंमलबावणीसंबंधीची एक नियमावली २०१६ च्या अखेरीस प्रसिद्ध करण्यात आली आणि त्यापाठोपाठ सेवा हक्क आयुक्तांचीही नियुक्ती



करण्यात आली. असा काही कायदा अस्तित्वात आहे, त्याने सामान्य नागरिकांस काही हक्क प्रदान केले आहेत आणि त्याचा वापर करून सरकारी सेवा हक्काने प्राप्त करून घेण्याची हिंमत सामान्यांना बहाल केली आहे, याची कल्पना बहुधा फारच थोड्याजणांना असावी. नागरिकांची सेवा हे सरकारी कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे, हे सेवा हक्क आयोगाचे घोषवाक्य आहे, हेही फारच थोड्यांना ठावूक असावे. कदाचित, आयोगाच्या या घोषवाक्याचे पालन करणे ही आपली जबाबदारी आहे याची जाणीव सरकारी कर्मचाऱ्यांत रुजविणे हाच या घोषवाक्याचा उद्देश आहे, आणि त्यानुसार कर्मचाऱ्यांनी आपली कार्यशैली आखावी हीच या आयुक्तालयाची किंवा आयोगाची अपेक्षा आहे. कारण या कायद्यान्वये शासनाचे सर्व विभाग नागरिकांना विहित कालावधीत संपूर्ण सेवा देण्यासाठी बांधील आहेत. अशी सेवा न मिळाल्यास त्याविरुद्ध दाद मागण्याची मुभादेखील या कायद्याने नागरिकांस दिली आहे, हेही अनेकांस ठावूक नसावे. कदाचित त्यामुळेच, या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी राज्यात व्हावी यासाठी नव्या दमाने आखणी सुरू झाली आहे. सर्वकाळ सेवेसाठी तत्पर असणे कर्मचाऱ्यांच्या अंगवळणी पडावे यासाठीच कदाचित सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवासंस्कृतीसंबंधीच्या आचारसंहितेचा मागोवा घेणे उचित ठरेल. सुमारे ४६ वर्षांपूर्वी, सन १९७९ मध्ये राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम या नावाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली होती. पुढे या नियमांतही वेळोवेळी नव्या सुधारणा व नव्या तरतुदीही समाविष्ट करण्यात आल्या. बहुधा अखेरची सुधारणा ३१ डिसेंबर २०१६ पर्यंतच्या काळात करण्यात आल्याने, ही नियमावली पुरेशी अद्ययावत मानता येईल. यामध्ये शासकीय कर्मचाऱ्याने पाळावयाची नीतितत्त्वे, माहितीचा अधिकार अधिनियमान्वये शासकीय माहिती पुरविणे, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळणुकीस प्रतिबंध आणि मुलांना नोकरीस ठेवण्यास प्रतिबंध या नव्या तरतुदींचा प्रामुख्याने समावेश आहे. अशी काही नियमावली असावी ही संकल्पना नवी नाही. १९३२ मध्येच अस्तित्वात आलेले नागरी सेवा वर्तणूक नियम आणि मध्य प्रदेश, हैदराबादमधून आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांस लागू असलेले सेवा नियम यांचे एकत्रीकरण करून ही नवी, सुधारित नियमावली तयार करण्यात आली. यातील ज्या काही नियमांची माहिती सर्वसामान्य जनतेस असणे आवश्यक आहे, त्यामध्ये, हुंडा घेण्यास प्रतिबंध, मादक द्रव्यांचे सेवन करण्यास प्रतिबंध आणि मागासवर्गातील कर्मचाऱ्यांस त्यांच्या खऱ्याखुऱ्या गाऱ्हाण्यांसाठी संबंधित मंत्र्याकडे दाद मागण्यास मुभा देणारा नियम महत्त्वाचा आहे. प्रत्येक शासकीय कर्मचारी आपल्या कर्तव्याप्रति नितांत सचोटी राखेल, कर्तव्यपरायणता दाखवेल आणि शासकीय कर्मचाऱ्यास अशोभनीय ठरेल अशी कोणतीही कृती करणार नाही, असाही या नियमावलीचा दंडक आहे. प्रत्येक कर्मचारी सार्वजनिक हिताचेच निर्णय घेण्यास बांधील असेल व सार्वजनिक साधनसंपत्तीचा कार्यक्षमतेने, परिणामकारक रीतीने व काटकसरीने वापर करण्यावर त्याचा कटाक्ष असेल, अशीही या नियमावलीची अपेक्षा आहे. नागरी सेवक या पदाचा कोणत्याही वैयक्तिक किंवा आर्थिक लाभासाठी वापर केला जाणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे कुटुंबास, मित्रांना किंवा संबंधितांना आर्थिक वा भौतिक लाभ मिळवून देणार नाही, तर केवळ गुणवत्तेच्या निकषावरच सारे निर्णय घेणे त्याच्यावर बंधनकारक राहील, असे ही नियमावली सांगते. या नियमावलीचे काटेकोर पालन होते किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी पर्यवेक्षीय पद धारण करणाऱ्या अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली आहे. तशी खात्री करताना, हा अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सचोटीची आणि कर्तव्यपरायणतेची खात्री करून घेण्यासाठी शक्य असलेल्या सर्व उपाययोजना करेल, असेही मार्गदर्शक तत्त्व या नियमावलीत समाविष्ट आहे. कोणताही शासकीय कर्मचारी या नियमावलीतील तरतुदीबाहेर जाऊन कोणतीही देणगी स्वतः स्वीकारणार नाही किंवा त्याच्या कोणत्याही कुटुंबीयास किंवा त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस देणगी स्वीकारण्यास परवानगी देणार नाही. त्याबरोबरच कोणत्याही व्यापारी, व्यावसायिक किंवा तत्सम संस्था संघटनांकडून मुक्तहस्ताने केलेला पाहुणचार किंवा वारंवार केला जाणारा पाहुणचार स्वीकारणेही टाळेल, असेही या नियमावलीने बंधनकारक ठरविले आहे.

गेल्या २८ तारखेपासून येत्या १२ मे पर्यंत राज्यात सेवा पंधरवडा राबविला जात आहे. तसा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या काळात जनतेशी संबंधित असणाऱ्या, विशेषतः महसूल, ग्रामविकास, नगरविकास, कृषी, आदिवासी विकास, सार्वजनिक आरोग्य, ऊर्जा, आदी विभागांसह सर्व शासकीय विभागांतील सेवा सर्वसामान्य जनतेस विनाविलंब आणि कर्तव्यभावनेने उपलब्ध करून द्याव्यात व नागरिकांच्या प्रलंबित अर्जविनंत्यांचा तत्परतेने निपटारा करावा असे आदेशही शासनाने जारी केले आहेत. शासकीय कामकाजाकरिता सरकारी कार्यालयांत भेट देणाऱ्या नागरिकांस साधारणतः जी कागदपत्रे सोबत बाळगावी लागतात आणि त्यापैकी कोणतेही दस्तावेज सोबत नसतील तर कामे होतच नाहीत, अशी कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचे विनंती अर्ज विनाविलंब मंजूर करून अशा कामांचा तत्काळ निपटारा करावा, जनतेस खेटे घालण्याची वेळ येणार नाही अशा रीतीने कामकाजाची आखणी करावी, असेही या आदेशाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. हीच कामे विहित वेळेत पूर्ण करता यावीत यासाठी २०१५ मध्ये 'आपले सरकार' नावाचे एक वेब पोर्टलही तयार करण्यात आले होते. या पोर्टलमुळे जनतेस आपली कामे विनाविलंब आणि हेलपाटे न घालता करून घेता येतील अशी सरकारची अपेक्षा होती. मात्र, ही व्यवस्था फारशी उपयुक्त ठरलेली नाही, हे आता सरकारच्या ध्यानी आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सेवा हक्क कायदा दशकपूर्तीच्या निमित्ताने या पोर्टलवरील कामकाजाचाही आढावा घेतला, आणि या पोर्टलवरील तक्रारी, अर्जांचा विहित कालमर्यादेत सक्षम अधिकाऱ्यांकडूनच निपटारा होत नसल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आली.

तत्पर सेवा ही आपली कार्यसंस्कृती आहे आणि आपण ती जपण्यासाठी कटिबद्ध आहोत, याची जाणीव करून देणारी पहिली नियमावली राज्यात जारी झाली, त्याला आणखी सात वर्षांनी शंभर वर्षे पूर्ण होतील. या नऊ दशकांहूनही अधिक काळात, सेवासंस्कृती आणि सेवा नियमावलीची सरकार दप्तरी काय स्थिती आहे, हेच या निमित्ताने स्पष्ट झाले आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या जबाबदारीचे पालन करताना आपण जनतेचे सेवक आहोत ही जाणीव ठेवून व जनतेची कामे करणे हे आपले कर्तव्य, जबाबदारीच आहे हे लक्षात घेऊन कामे केली पाहिजेत, ही अपेक्षा असते. मात्र, कर्मचाऱ्यांना सातत्याने कोणत्या ना कोणत्या निमित्ताने या जबाबदारीची जाणीव करून द्यावी लागते. खुद्द सरकारकडून ते काम केले जातेच, पण सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनादेखील अधूनमधून अशी जाणीव करून देणाऱ्या मोहिमा राबवत असतात. महाराष्ट्रातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या एका संघटनेमार्फत अशीच एक अभिनव मोहीम अधूनमधून राबविली जाते. 'पगारात भागवा' या अभिनव मोहिमेचा संदेश नेमका काय आहे, हे उकल करून सांगण्याची गरज नाही. वेगवेगळे वेतन आयोग, अधूनमधून सरकारकडून केली जाणारी भत्तेवाढ आदी कारणांमुळे सरकारी कर्मचाऱ्यास आपल्या उपजीविकेस पुरून उरेल एवढे वेतन मिळत असल्याने त्या वेतनातूनच आपल्या उपजीविकेचा खर्च भागवावा, असा संदेश या मोहिमद्वारे दिला जातो.

थोडक्यात, जनतेच्या सेवकाने जनतेची कामे करून देण्याकरिता जनतेच्या खिशात हात घालू नये, अशी या मोहिमेची अपेक्षा असते. या संघटनेने आखून दिलेली ही एक कार्यसंस्कृती हा अनेकदा चर्चेचा विषय झाला असून अशी गळ घालण्याची वेळ सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनेवर का यावी याचे कोडे सर्वसामान्यांना अनेकदा उकललेले नाही. मात्र, असे काही उपक्रम सुरू झाले, की सरकारी कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या, कर्तव्ये, सेवा संस्कृती, कार्यशैली आदी अनेक मुद्यांची समाजात चर्चा होत असते. आपली जनमानसातील प्रतिमा जपणे हे कोणत्याही यंत्रणेचे कर्तव्य असते. सरकारी कर्मचारी त्यास अपवाद नाहीत. या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठीच सरकारही प्रयत्नशील असते. सेवा हक्क कायद्याच्या दशकपूर्तीच्या निमित्ताने याचा मागोवा घेताना, सुमारे शंभर वर्षांपासून कार्यशैलीवर संस्कार घडविण्याच्या प्रयत्नांच्या पाऊलखुणा सापडून गेल्या. ही वाटचाल अशीच सुरू राहणार का, हे यापुढे संबंधित यंत्रणांनाच ठरवावे लागेल.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### रामदासजी, त्या शालीची ऊब अजून कायम आहे

अक्षयतृतीया, बुधवार, ३० एप्रिल २०२५. डॉ. रामदासजी आंबटकर अनंताच्या प्रवासाला शांतपणे निघून गेले.



त्यांच्या तब्येतीकडे बघता ही बातमी धक्कादायक नव्हती. तरी पण मनात कुठं तरी एक आशेचा किरण होता. रामदासजी पुन्हा पूर्ववत बरे होऊन येतील आणि भेट झाल्यावर ''काय सतीशजी...'' म्हणून पुन्हा पाठीवर हात मारतील. पण आता ते शक्य नाही हे कळत असूनही मन मानत नाही हे नक्की.

१ जुलै २०२४! स्थळ वडनेर. निमित्त डॉ. रामदासजींचा जन्मदिनाच्या निमित्ताने एका कौटुंबिक कार्यक्रमाचे आयोजन. मी बसलो असताना अचानक माझं नाव बोलण्यासाठी पुकारलं गेलं. मी बोललो. भाषण आटोपून माझ्या जागेवर जाण्यासाठी निघालो. तेवढ्यात डॉ. रामदासजींचा आवाज. ते मला बोलवत होते. मी परत स्टेजवर गेलो तर चक्क माझ्या अंगावर शाल देऊन मला पुष्पगुच्छ देऊन माझा सन्मान केला. मी संकोचून गेलो होतो. म्हटले वाढदिवस तुमचा आहे. सत्कार तुमचा करायला पाहिजे. त्यावेळी ते म्हणाले, ते काळजात कोरून ठेवण्यासारखं आहे. ते म्हणाले अनेक पायव्याच्या दगडामुळे ही इमारत उभी राहिली आणि आजच्या तुमच्या भाषणासाठी खूप धन्यवाद. त्या नंतर एक दोनदा त्यांची ओझरती भेट झाली त्यावेळी त्यांनी त्या भाषणाचा कौतुकाने उल्लेख केला होता.

एका ध्येयनिष्ठ स्वयंसेवकाची इनिंग अर्धवट ठेवून ते अज्ञाताच्या प्रवासाला निघून गेले. आणि अचानक काहीतरी मोठे हरपले आहे हे जाणवले. त्यांचे संपूर्ण जीवन हे संघानुलक्षी होते. खाजगी, कौटुंबिक, सामाजिक आणि चरितार्थ या चतुर्विध आयामात... एक सुंदर व संपन्न आयुष्य होते. एक आदर्शवत व्यक्तिमत्त्व चर्मचक्षूच्या टप्प्याच्या बाहेर निघून जाण्याने एक पोकळी निर्माण करणारे असते. जीवघेण्या आजारावर मृत्यूला आव्हान देणारे तेजस्वी रूप अनुभवले. आपल्या अपूर्ण परंतु कृतार्थ जीवनाचे संपूर्ण समाधान घेऊन निर्विषय - निरामय व सन्यस्त मनाने ते परलोकवासी झाले. जगात वागावे कसे हे त्यांच्याकडे पाहून शिकावे. त्यांच्या महाराष्ट्रभर पसरलेल्या कार्यकर्त्यांवर पसरलेले हे मळभ दूर होण्यासाठी काळ हाच उत्तम उपाय आहे. 'इदं न मम: राष्ट्राय स्वाहा' या मंत्राची शिकवण देणाऱ्या एक राष्ट्र सर्वतोपरी मानणाऱ्या विचारधारेवर शेवटच्या श्वासापर्यंत विश्वास ठेवणाऱ्या त्यांच्या आत्म्यास त्यांनी मिळविलेल्या अधिकारानुरूप सद्‌गती व शांती मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

**सतीश शं. वखरे**/हिंगणघाट

### संवेदनशील संघटक

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे ज्ञान, चारित्र्य, एकता हे ब्रीदवाक्य आचरणारे आणि ''कार्यकर्ता जसा आहे तसा स्वीकारणे अन् संघटनेच्या कार्यासाठी त्याला व्यवस्थित घडविणे...'' हे सूत्र कायम समाजजीवनात आचरणात आणणारे संवेदनशील, लोकाभिमुख भाजप नेता डॉ. रामदास आंबटकर यांचे निधन हजारोंना चटका लावणारे आहे. ढोबळमानाने अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ कार्यकर्ता ते विद्यापीठ सिनेट सदस्य ते भाजपाचे अविरोध निर्वाचित विधानपरिषद सदस्य असा त्यांच्या कार्याचा चढता आलेख आहे.

अभाविपचे संस्थापक व कुशल संघटक प्रा. दत्ताजी डिडोळकर यांच्या सहवासात, मुशीत घडलेले आणि दत्ताजींचा जणू डोक्यावर आशीर्वादाचा अदृश्य हात असलेले रामदासजी आंबटकर हे सामाजिक व संघटनकार्यासाठीच जन्मले होते. १९९१ च्या सुमारास अभाविपचे कार्यकर्ता सुनील राजे यांच्या प्रेरक, पाठिंब्याने मी विद्यार्थी परिषदेच्या यवतमाळ नगर कार्यकारिणीत जोडला गेलो. त्यानंतरच्या काळात रामदास आंबटकर, सुनील आंबेकर, सुनील देशपांडे, सैदाजी रेड्डी यांच्या व इतर अनेकांच्या संपर्कात आलो. दोन प्रसंग आठवतात - पहिला , यवतमाळच्या संघ कार्यालयात विद्यार्थी परिषदेच्या जिल्हास्तरीय बैठकीतील अवकाश वेळेत एका कार्यकर्त्याच्या असंस्कृत वर्तनाने मी नाराजी व्यक्त केली होती. त्या दिवशी डॉ. रामदासजी कार्यक्रमानिमित्त यवतमाळमध्ये होते. त्यांना हे कळल्यावर.. .''सरांच्या नाराजीचे कारण दूर करा. कार्यकर्ता तुटू देऊ नका!'' असे संबंधितांना बजावले होते. दुसरी आठवण प्रा. डॉ. चांदेकर सरांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून निवड होऊन ते पदाचा कार्यभार स्वीकारणार होते त्यादिवशीची. त्या सकाळी मी रामदासजींना फोन करून काही माहिती विचारली तेव्हा व्यस्ततेही त्यांनी माहिती दिली व माझे समाधान केले. बुलढाणा येथे कार्यरत शिक्षक, अभाविपचे मधुरभाषी कार्यकर्ता मयूरेश कुळकर्णी म्हणाले त्याप्रमाणे रामदासजींना कार्यकर्त्यांची विचारपूस करणे, त्यांच्यासह अधिकाधिक वेळ घालवणे व त्याच्या अडचणी सोडवणे भावत असे. संत तुकारामांच्या वचनानुसार (अक्षय्यतृतीयेच्या दिवशी) इहलोकीचा निरोप घेऊन आपला शेवटचा दिवस गोड केलेले संघटनकुशल रामदासजी आंबटकर यांना श्रद्धांजली.

**प्रा. विवेक रा. विश्वरुपे**/८८०५१५७४७५

### जातनिहाय जनगणनेच्या उद्देशात फरक

अखेर केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याची तयारी दाखवल्याची बातमी वाचली आणि त्यावरील संधी, क्षमता आणि सिद्धतेची कसोटी हा अग्रलेखही वाचला. (तरुण भारत, ३ मे). यापूर्वी भारतात १९३१ साली ब्रिटिश राजवटीत अखंड भारतामध्ये जातनिहाय जनगणना झाली होती. यानंतर पारतंत्र्यात असतानाच पुन्हा १९४१ मध्ये आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर २०११ मध्ये यूपीए सरकारने जातनिहाय जनगणना केली होती. पण या दोन्ही जनगणनेची माहिती तत्कालीन सरकारांनी कधीच जाहीर केली नाही. तत्पूर्वी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५१ मध्ये तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल यांनी जातनिहाय जनगणनेमुळे होणाऱ्या नुकसानीची जंत्री दिली आणि त्यावेळी जातनिहाय जनगणना करण्यास साफ नकार दिला होता. पण आता गेल्या काही दशकांत पुलाखालून बरेचसे पाणी वाहून गेले आहे आणि त्यामुळे जातनिहाय जनगणना करण्याच्या मागणीने जोर धरला आहे. गेल्या काही वर्षांपासून काँग्रेसचे नेते राहुल गांधींनी तर जातनिहाय जनगणना करण्याची मागणी रेटून धरली होती. आता नरेंद्र मोदींनी त्याला मान्यता दिली असल्याने काँग्रेसचे नेते स्वतःची पाठ थोपटून घेणार यात शंकाच नाही. परंतु अशी जनगणना करण्यामागे भाजप आणि काँग्रेसच्या उद्देशांमध्ये मूलभूत फरक असल्याचे दिसते.

खंडप्राय असलेल्या अखंड हिंदुस्थानवर सलगपणे दीडशे वर्षे आपली निरंकुश सत्ता चालवण्यासाठी ब्रिटिशांनी फोडा आणि झोडा या तत्त्वाचा अनिर्बंध वापर केला होता. देशातील जनतेला धर्म, जातपात, पंथ, भाषा आणि प्रांत अशा मुद्यांवर सातत्याने एकमेकांत लढवत ठेवून तमाम हिंदुस्थानी नागरिकांना ब्रिटिशांनी या मुद्यांवर कधीच एकत्र येऊ दिले नव्हते. काँग्रेसच्या नेत्यांचे ब्रिटिशांशी असलेले सौहार्दाचे संबंध लक्षात घेऊन, ब्रिटिशांनी स्वातंत्र्य बहाल करताना, काँग्रेसच्या सहकार्याने, धर्माच्या आधारावर अखंड हिंदुस्थानचे तीन तुकडे करून खंडित स्वातंत्र्य बहाल केले. फाळणीच्या वेळी लाखो लोकांना आपले प्राण गमवावे लागले, महिलांना आपली अब्रू लुटल्याचा अपमान भोगावा लागला, अनेक जण अनाथ झाले, लाखोंचे संसार उद्ध्वस्त झाले. स्वातंत्र्य देताना ब्रिटिशांनी आपल्या प्रिय काँग्रेसला फोडा आणि झोडा हे ब्रह्मास्त्र भेट म्हणून दिले. याबाबत ब्रिटिशांचाही बाप असलेल्या काँग्रेसच्या नेत्यांनी या ब्रह्मास्त्रात लुटा या शस्त्राचा समावेश केला आणि सात दशके फोडा, झोडा आणि लुटा या त्रिसूत्रीचा वापर करून, सत्ता भोगण्याबरोबरच, देशाची मनसोक्त, अविरत आणि अनिर्बंध लुटमार केली. ब्रिटिशांप्रमाणेच काँग्रेसनेही सात दशकांत भारतीयांना कधीच एकत्र येऊ दिले नाही. आताही जातनिहाय जनगणनेच्या मागणीमधून काँग्रेसच्या नेत्यांचे हेच मनसबे असल्याचे दिसते आहे. सत्तेसाठी देशातील मतदारांमध्ये या सगळ्या मुद्यांवरून फूट पाडायची आणि सत्तेवर अंकुश ठेवायचा यासाठीच काँग्रेसला जातनिहाय जनगणना हवी आहे. हिंदू धर्मातील लोकांना जातींमध्ये विभागून त्यांचे खच्चीकरण करण्याचा काँग्रेसचा उद्देश आहे.

याउलट भाजपा, एनडीए आणि नरेंद्र मोदींचा जातनिहाय जनगणना करण्याचा उद्देश सकारात्मक आहे. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन धर्मांमधील मागासलेल्या, अप्रगत, वंचित, पीडित आणि सतत दुर्लक्षित राहिलेल्या जनतेलाही विकासाची द्वारे उघडून देऊन त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेणे, हाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एकमेव उद्देश आहे.

तेव्हा जातनिहाय जनगणनेच्या मागणीमागे काँग्रेस आणि भाजपाच्या उद्देशांमध्ये असलेला हा मूलभूत फरक नीटपणे समजून घेणे आवश्यक आहे. काँग्रेसच्या लबाड धोरणांना पाठिंबा न देता नरेंद्र मोदींच्या सबका साथ, सबका विकास या धोरणांना पाठिंबा देणे हे सर्वधर्मीय देशवासीयांचे प्रथम कर्तव्य आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### चुकांतून शिकण्याची संधी

एकदा शिशिरने वडिलांच्या खिशातून पैसे चोरले आणि शाळेच्या मुलांबरोबर परस्पर सिनेमाला गेला. घरी आल्यावरही साळसुदपणे वागू लागला. इतका सालस मुलगा, पण कुसंगतीमुळे त्यालाही असे काही करावेसे वाटले. कधीही कमी गुण न मिळणाऱ्या मुलाला या वेळी सहामाहीतही कमी गुण मिळाले होते. घरात तिघेच राहत असल्यामुळे आईबाबांनी आपसात चर्चा केल्यावर आणि इतक्यातल्या त्याच्या वागणुकीमुळे हे कृत्य कोणाचे असू शकते हे चटकन लक्षात आले. त्या रात्री आईने प्रेमाने शिशिरला याबद्दल विचारले. आधीच भांबावलेला असल्यामुळे आईच्या प्रेमळ शब्दांनी त्याला रडूच फुटले आणि त्याने आपली चूक कबूल केली. त्याची आई समजूतदार होती. पुन्हा असे वागणार नाही अशी शपथ तर त्याच्याकडून घेतलीच पण बाबांना जाऊन मी चुकलो, मला क्षमा करा असे म्हणून माफी मागण्याची जबाबदारी तुझी असे बजावले. वडिलांच्या कानावर ही गोष्ट गेली आहे हे त्याला कळलेच होते. पण कोणत्या तोंडाने माफी मागणार म्हणून तो चूपच होता. पुढले काही दिवस तणावात गेले. आईने पुन्हा ही गोष्ट त्याला सांगितली नाही कारण मी चुकलो ही कबुली त्याच्याकडून ओठावर यायला हवी होती. त्याला असह्य झालं आणि शेवटी मनाचा हिय्या करून तो बाबांजवळ जाऊन भरल्या डोळ्यांनी सॉरी परत असे कृत्य माझ्या हातून घडणार नाही असे म्हणाला. त्याला वाटले आता बाबा फार संतापणार आणि कदाचित मार पण देणार पण बाबाही रडत होते. हे दृश्य त्याला नवीन होते. त्याच्या माफी मागण्याने तेही विरघळून गेले होते. केवढी किमया केली होती एका शब्दाने... आणि घरातला आनंदाचा, मोकळेपणाचा प्रवाह परत वाहायला लागला.

चूक आणि बरोबर असं शंभर टक्के काही नसतंच. त्यामुळे प्रत्येक वेळेला एकच निर्णय योग्य असतो असं नाही. एक किस्सा आठवतोय. एका ऑफिसमधील कर्मचारी अद्यातखोरपणाने मासिक हजेरी रजिस्टरवर सही करत नसे. त्यांच्या म्हणण्यानुसार त्याच्या कनिष्ठ अधिकाऱ्याने त्यांच्याकडे रिजिस्टर घेऊन यावे मगच ते सही करतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांना ही बाब समजली तेव्हा ते स्वतः शिपायाच्या आवेशात त्या कर्मचाऱ्याकडे गेले आणि सही मागितली. कर्मचारी वरमला, लज्जित झाला आणि त्याने क्षमा मागितली. स्वतःची चूक त्याच्या लक्षात आली होती. माणूस चुकतो, खरं तर चुकतो तोच माणूस. पण त्याला आपली चूक कळणं आणि त्याने ती उघडपणे मान्य करणं हे खरं शहाणपण असतं. चुकलो असं जर कोणी मनापासून म्हणत असेल तर त्याच्या खांद्यावर हात ठेवून ठीक आहे, होतं असं... तुला कळली ना चूक झालं तर मग... पण हीच चूक परत होणार नाही याची काळजी घे म्हणजे झालं... असं उदारपणे सांगून त्याच्या विश्वासाला बळ देणं हे जवळच्या माणसाचं काम आणि त्याचं अपराधीपण कसं घालवता येईल हे देखील जवळच्या व्यक्तीचं काम. आपण नाही का गणपतीला आळवतो अपराध माझे कोट्यानुकोटी मोरेश्वरा बा तू घाल पोटी. ज्याचे पोट आपल्या अपराधांना पोटात घालून मोठे झाले आहे तो लम्बोदर उदारपणे आपल्याला क्षमा करतो तसे आपण सहजासहजी दसऱ्याची चक पोटात घालत नाही.

म्हणूनच म्हटले आहे ना सुबह का भुला शाम को जब घर लौटता तो उसे भुला नहीं कहते!

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### श्री आनंदराव अनंतात विलीन




श्री आनंदराव कुलकर्णी, महाराष्ट्र विद्युत मंडळाचे टेक्निकल डायरेक्टर ८० वर्षांचे असताना त्यांना कर्करोगाने ग्रासले. अनेक महिने त्यांच्यावर पुणे येथील हॉस्पिटलमध्ये उपचार चालू होते. तेथील उपचार संपल्यानंतर ते सोलापूरला घरी आले. जांघेमध्ये जखम होती. त्या जखमेचे ड्रेसिंग रोज केले जात होते. उपचाराला शरीर साथ देत आहे. असे जाणवत होते. परंतु त्यांची प्रकृती खालावत गेली आणि अखेर २१ एप्रिल रोजी त्यांची प्राणजोत मालवली.

अतिशय सरळ स्वभावाचे निगर्वी परोपकारी वृत्तीचे व्यक्ति होते. लातूर जवळील खेडे गावांमध्ये त्यांचे शालेय शिक्षण झाले. आंबेजोगाईच्या महाविद्यालयातून ते १२ वीमध्ये पहिले आले. व संभाजीनगर (औरंगाबाद) च्या इंजिनिअरिंग कॉलेजमधून प्रथम वर्गात बी.ई. इलेक्ट्रिकल झाले. व लगेच महाराष्ट्र वीज मंडळात इंजिनिअर पदावर रुजू झाले. व स्व-कर्तृत्वाने मुख्य अभियंता व टेक्निकल डायरेक्टर पदावरून सेवानिवृत्त झाले. हाताखालच्या कर्मचाऱ्यांना ते मानाने राबवत असत. असा अधिकारी मिळणे दुर्मिळ. निवृत्ती नंतर त्यांच्या चिरंजीव (श्री भगवंतराव) यांच्या मदतीने ट्रान्सफार्मर बनाविण्याची फॅक्टरी सुरु केली व नावारुपास आणली. त्यांच्या निधनाने व्यवसायाचे व कुटुंबियांचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या आत्म्यास चिर शांती लाभो व त्यांच्या कुटुबियांस दुःख सहन करण्याची शक्ती लाभो. अशी त्या जगनियंत्याच्या चरणी प्रार्थना

**- सु.स. देशमुख**/ ९८२२०४३९४९

### नागपूर विद्यापीठाचा संविधान शिक्षणाचा ऐतिहासिक निर्णय



भारताच्या लोकशाहीचा आत्मा असलेल्या भारतीय संविधानाचा अभ्यास आता नागपूर विद्यापीठातील प्रत्येक विद्यार्थ्यासाठी अनिवार्य होणार अशी माहिती समाज माध्यमावरून झळकली. भारतीय लोकशाहीचा आत्मा असलेले भारतीय संविधान हे प्रत्येक भारतीयाने जाणून घेणे अत्यावश्यक आहे. अनेक वर्षांपासून नागरिकांकडून व अभ्यासकांकडून ही मागणी होत होती की संविधानाचा अभ्यास सर्वच विद्यापीठांत अनिवार्य व्हावा व ती काळाची गरज सुद्धा आहे. अखेर ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली आहे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने. नागपूर विद्यापीठाने देशात एक आदर्श निर्माण करत सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक अभ्यासक्रमात 'भारतीय संविधान' हा विषय अनिवार्य केला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत दोन क्रेडिट्सचा अभ्यासक्रम तयार करून, हे विद्यापीठ सर्व विद्यार्थ्यांना संविधान शिकवणारे देशातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. भारताच्या संविधान स्वीकृतीला ७५ वर्षे पूर्ण होत असताना हा निर्णय विद्यापीठातर्फे घेण्यात आला. हा अभ्यासक्रम विद्यापीठाच्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये समाविट करण्यात आला असून, यामुळे विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवशास्त्र व आंतरविद्याशाखीय अभ्यास या चार प्रमुख शाखांमधील ३५० हून अधिक अभ्यासक्रमांमध्ये आता संविधान विषयाचा समावेश करण्यात आला. बी. ए.. बी. कॉम., बीएससी यासारख्या पदवी अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या सेमिस्टरमध्ये उन्हाळी २०२५ पासून हा विषय बंधनकारक केलेला असून या निर्णयामुळे सुमारे ३ लाख विद्यार्थ्यांना भारतीय संविधान अभ्यासक्रमात शिकण्याची संधी मिळणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी आपल्या या स्व-संकल्पनेला कृतीत उतरवून पूर्णत्वास आणले. विद्यापीठाच्या या निर्णयामुळे संविधानप्रेमी, जबाबदार व जागरूक नागरिक घडवण्याची प्रक्रिया विद्यापीठाच्या मार्फत सुरू झाली. या निर्णयामुळे नागपूर विद्यापीठ प्रत्येक पदवीच्या अभ्यासक्रमात संविधान शिकविणारे प्रथम विद्यापीठ ठरले आहे. कार्यक्षेत्र असलेल्या नागपूर, भंडारा, वर्धा व गोंदिया जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांमध्ये या ऐतिहासिक निर्णयाच्या माध्यमातून संविधानाबद्दल आस्था निर्माण होणार असून एक महत्त्वाचे राष्ट्रनिर्माणाचे पाऊल ठरणार आहे. संविधानातील महत्त्वाचे मुद्दे समाविट असलेले पुस्तक तीन भाषांमध्ये संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी निःशुल्क उपलब्ध होणार असून, सर्वोच्च असलेले संविधान विद्यार्थ्यांना पुन्हा जवळून अनुभवता येईल. हा विद्यापीठाचा निर्णय म्हणजे शिक्षण आणि लोकशाहीचे एक सुंदर संमेलन आहे. या निर्णयामुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संविधान शिक्षणाचा आदर्श ठरवणारे देशातील पहिले विद्यापीठ बनले.

**वैभव बावनकर**/९५४५७४५५८०

### हवनाचे धार्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व

हिंदू धर्मात हवन करण्यास विशेष महत्त्व आहे. प्राचीन काळापासून ही परंपरा चालू आहे. रामायण, महाभारत काळातच नव्हे तर त्या पूर्वीपासूनही हवन केले जात होते, याची अनेक उदाहरणे आहेत. अग्नीमध्ये विविध औषधी वनस्पती, तूप आणि अन्नधान्य यांची आहुती दिली जाते. हवनामुळे वातावरणातील दूषित घटक नष्ट होऊन वातावरण शुद्ध होते. हवन करताना होणाऱ्या मंत्रोच्चारांमुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. उच्चारित होणारे मंत्र व त्यातून निर्माण होणाऱ्या कंपनांमुळे मन शांत होते.

हवनासंदर्भात काही शास्त्रज्ञांनी संशोधन केले आहे. फ्रान्समधील 'ट्रेले' नावाच्या शास्त्रज्ञाने आपल्या संशोधनात निष्कर्ष काढला की, हवन मुख्यतः आंब्याच्या समिधांनी केले जाते आणि आंब्याचे लाकूड जळल्यावर 'फॉर्मिक अल्डिहाइड' नावाचा वायू उत्पन्न होतो. हा वायू हानिकारक विषाणू आणि जीवाणूंना नष्ट करून वातावरण शुद्ध करतो. 'टौटिक' नावाच्या शास्त्रज्ञाच्या हवनविषयक संशोधनात असे आढळले की, अर्धा तास हवन केल्यास किंवा हवनाच्या धुराचा शरीराशी संपर्क झाल्यास 'टायफॉईड'सारखे हानिकारक रोग पसरवणारे जीवाणू नष्ट होतात आणि शरीर शुद्ध होते. राष्ट्रीय वनस्पती अनुसंधान संस्थान, लखनौ येथील शास्त्रज्ञांना असे आढळले की, हवनामुळे वातावरणातील हानिकारक विषाणू आणि जीवाणूंचा नाश होतो आणि एकदा केलेल्या हवनाचा परिणाम एक महिना टिकतो. 'एथ्नोफार्माकोलॉजी' या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत (२००७) प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, यज्ञामुळे केवळ माणसालाच नव्हे तर वनस्पती आणि पिकांची हानी करणाऱ्या जीवाणूंचाही नाश होतो. वरील सगळे संशोधन हे आजच्या काळातील शास्त्रज्ञांनी केलेले आहे. मात्र, हिंदू धर्मशास्त्रात अग्निहोत्र, विविध यज्ञ आणि त्यासमवेत वापरण्यात येणाऱ्या सामग्री या संदर्भातील माहिती विविध ग्रंथात आढळते. अगदी दररोज अग्निहोत्र केल्यास अणुबाम्ब पडल्यावर निर्माण होणाऱ्या लहरींपासूनही संरक्षण होऊ शकते, असेही पूर्वी सिद्ध झाले आहे.

आजही अनेक संत याविषयी मार्गदर्शन करतात. परंतु त्याचे महत्त्व आपल्याला तेव्हाच पटते, जेव्हा त्याबाबत शास्त्रीय पद्धतीने संशोधन झालेले आपल्यासमोर येते. ऋषिमुनींनी वेद आणि उपनिषदांमध्ये सांगितलेले ज्ञान केवळ धार्मिक नव्हे, तर पूर्णतः वैज्ञानिक आहे. म्हणूनच ऋषिमुनींच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांनी दिलेले ज्ञान आचरणात आणायला हवे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ‘अभिनव’च्या उपाध्यक्षपदी विवेक रेड्डी यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ एप्रिल -** लातूर येथील यशस्वी उद्योजक तथा अभिनव मानव विकास संस्थेचे ज्येष्ठ विवेक रेड्डी यांची संस्थेच्या उपाध्यक्षदी एकमताने निवड करण्यात आली आहे.

अभिनव मानव विकास संस्थेच्या कार्यकारी मंडळाची बैठक गुरुवारी, श्रीकिशन सोमाणी विद्यालयात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा हे होते. या बैठकीत एकमताने संस्थेच्या उपाध्यक्षपदी संस्थेचे ज्येष्ठ सदस्य तथा यशस्वी उद्योजक विवेक रेड्डी यांची निवड करण्यात आली.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ.चेतन सारडा यांनी नूतन उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आलेले उद्योजक विवेक रेड्डी हे अतिशय शांतपणे, अभ्यासपूर्ण मत मांडणारे व्यक्तिमत्व असल्याचे सांगितले. विविध सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या विवेक रेड्डी यांच्या मार्गदर्शनाचा अभिनव मानव विकास संस्थेला निश्चित उपयोग होईल,असा विश्वासही डॉ. सारडा यांनी व्यक्त केला.

संस्थेचे उपाध्यक्ष सीए प्रकाश कासट यांनी यावेळी बोलताना नूतन उपाध्यक्ष विवेक रेड्डी यांचा स्वभाव नेहमी सगळ्यांना सहकार्य करण्याचा राहिला आहे,असे सांगितले. त्यांच्याशी आपला मागच्या चार दशकांपासूनचा संबंध असून संस्थेच्या कार्याचा नावलौकिक वाढविण्याकामी रेड्डी यांचे योगदान महत्वपूर्ण ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

संस्थेचे सचिव कमलकिशोर अग्रवाल यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या प्रत्येक कार्य, उपक्रमात हिरीरीने आघाडीवर असणाऱ्या विवेक रेड्डी यांची उपाध्यक्षपदी करण्यात आलेली निवड ही संस्थेसाठी अतिशय गौरवपूर्ण बाब असल्याचे सांगितले.



### संक्षिप्त वृत्त...

## सताक्षी राठोडचा हाकेतांडा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा ता.रेणापूर जि.लातूर येथील माजी विद्यार्थीनी कु. सताक्षी काशिनाथ राठोड या विद्यार्थिनीने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे, पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र झाल्याबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा शाळेतून प्राथमिक शिक्षण पूर्ण करून अधिकारी झालेले राज्यकर निरीक्षक संतोष जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

हाकेतांडा, तालुका रेणापूर या भौतिक सुविधा नसलेल्या छोट्याशा वस्तीतून या विद्यार्थीनीने प्रचंड कष्ट घेऊन कसल्याही प्रकारचे क्लास किंवा ट्युशन न लावता या शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरली आहे.सदरील विद्यार्थिनी हे प्रचंड कष्ट आणि स्वतःच्या मेहनतीतून अभ्यास करून हाकेतांडा या तांड्याचं नाव लौकीक केले आहे. अशा प्रतिभावंत विद्यार्थिनीच भविष्यात आयपीएस घडू शकतात असे गौरव उद्गार शाळेतील शिक्षकांनी व्यक्त केले आहे. सदरील विद्यार्थिनीचा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व सर्व गावकऱ्यांच्या वतीने जाहीर सत्कार शाळेत करण्यात आला.यासाठी तिच्या या यशस्वीतेसाठी मार्गदर्शक म्हणून शाळेतील मुख्याध्यापक सावळकर गणेश,जाकिर शेख या शिक्षकाने प्रचंड मेहनत घेतली व मार्गदर्शन केले आहे. यावेळी शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष त्र्यंबक राठोड, काशिनाथ राठोड,संजय चव्हाण,इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते.

## ‘टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक’ कार्यक्रमात सहभाग नोंदवा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -** राज्यातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी राज्य शासनाने ५ ते ९ मे २०२५ दरम्यान ‘टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीकचे’ आयोजन केले आहे. या कार्यक्रमांतर्गत आयोजित केलेल्या प्रशिक्षणासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी राज्य शासनातर्फे ‘टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक’ हा कार्यक्रम आयोजित केला आहे. आधुनिक तंत्रज्ञान व नवीन कल्पनांचा संगम असलेली ‘टेक वारी’ म्हणजे पहिली डिजिटल वारी असून याची सुरूवात मंत्रालयातून होणार असून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या कानाकोपऱ्यात तंत्रज्ञानाचा प्रसार करुन त्यामधून आधुनिक तंत्रस्नेही महाराष्ट्र घडविण्याची प्रयत्न करण्यात येणार आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि अपर तहसीलदार यांना या कार्यशाळेत ऑनलाइन पद्धतीने सहभागी होण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## महात्मा बसवेश्वरांनी दक्षिण भारतात समग्र विचारक्रांती घडवून आणली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -** महात्मा बसवेश्वरांनी आपले तत्त्वज्ञान आपल्याच कन्नड भाषेत सांगितले. त्याचे प्रतिबिंब मराठी वारकरी संप्रदायावर दिसून येते. सामाजिक ऐक्याची चर्चा अनुभवमटपात होत असे. ती जगातील पहिली कृतिशील संसद होय. मंदिरातील पुजाऱ्यांच्या अर्थकारणावर त्यांनी प्रथम आपल्या वचनातून प्रहार केला. २१ व्या शतकातील बुद्ध म्हणून त्यांची नोंद केली जाते. त्यांचे विचार कृतीत आणि आचरणात आणणे ही काळाची गरज आहे. महात्मा बसवेश्वनी दक्षिण भारतात समग्र सामाजिक विचारक्रांती घडवून आणली. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक क्रांतीविज्ञान या विषयावर पुष्पगुंफताना केले.

महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बाभळगाव यांच्या वतीने आयोजित जाहीर व्याख्यानमालेत प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उपसरपंच गोविंद देशमुख यांनी भूषविले होते. बहुजन समाजात महात्मा बसवेश्वरांनी स्वाभिमान निर्माण केला. जेथे राबती हात तेथे ईश्वर ही संकल्पना रुजवून श्रम हे श्रेष्ठ हे तत्त्वज्ञान त्यांनी सांगितले. सदाचार हा स्वर्ग तर अनाचार हा नर्क, त्यांनी कर्मकांडाला नाकारले, पुरोहित शाहीला विरोध केला. मंदिराचे महात्मे नाकारले असे यावेळी डॉ. कटारे म्हणाले.

## गोवंश विक्री केल्याप्रकरणी पोलीस निरीक्षकांच्या बडतर्फीची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -** ३१ गोवंश बेकायदेशिररित्या कसायाला विक्री केल्याप्रकरणी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांच्यावर गुन्हा दाखल करून करून त्यांच्यावर विनाविलंब बडतर्फीची कार्यवाही करण्याची मागणी गोरक्षक ओम माळी, आदित्य शिंदे, ज्योतीराम क्षीरसागर यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात त्यांनी असे नमूद केले आहे की, दि. १८ मार्च २०२५ रोजी उदगीरच्या ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन छोटा हत्ती व आयशर टेम्पोमधून ३१ गोवंश अतिशय निर्दयीपणे कोंबून त्यांची तस्करी केली जात होती. त्याची माहिती गोरक्षकांनी उदगीर ग्रामीण पोलिसांना दिली होती. त्या माहितीनुसार पोलिसांनी चारही वाहने पकडून ३१ गोवंशही ताब्यात घेतले. मात्र गुन्हा दाखल केल्यानंतर कायद्यानुसार हे गोवंश गोशाळच्या कस्टडीत द्यावे लागतात. कोर्टाचा निकाल लागेपर्यंत हे गोवंश गोशाळेत ठेवणे बंधनकारक आहे. असे असतानाही उदगीर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांनी पकडण्यात आलेले ३१ गोवंश कोणत्याही गोशाळेत सोडण्याऐवजी ते कसायाला विकल्याचे आरोपही गोरक्षकांनी केला आहे. पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांना जप्त केलेला मुद्देमाल व गोवंश



न्यायालयाच्या अनुमतीशिवाय कोणाच्याही ताब्यात देण्याचा अधिकार नसतानाही ही बेकायदेशीर कृती करण्याचे काम केले आहे. अशा मनमानीपणे वागणाऱ्या अमानवी कृती करणाऱ्या राजकुमार पुजारी यांच्यावर तात्काळ गोवंश हत्याबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांच्यावर बडतर्फीची कार्यवाही करण्यात यावी,अशी आग्रही मागणीही सदर निवेदनात करण्यात आली आहे.


याच प्रकरणी गोरक्षक ज्योतीराम क्षीरसागर, आदित्य शिंदे, ओम माळी यांनी लातूरच्या गांधी चौकात पाच दिवस आमरण उपोषण केले होते. या उपोषणाची दखल घेत आमदार अभिमन्यू पवार यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यासह सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची शासकीय विश्रामगृहावर पशु हत्याबंदी कायद्यांतर्गत बैठक बोलावली होती. या बैठकीतही दोषी पोलीस अधिकारी पुजारी यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी,अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी केली.

## शिष्यवृत्ती परीक्षेत संगमेश्वर विद्यामंदिरचे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -** शहरातील सोमवंशीनगरातील संगमेश्वर प्राथमिक विद्यामंदिरने पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यशाची परंपरा कायम राखली असून २०२५ च्या परीक्षेत १२ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.





या परीक्षेत स्नेहशंभू नवनाथ बोराडे याने २१० गुण, श्रेया विकास कांबळे १९६, गौरव गोविंद चव्हाण १९४, गणेश सोमनाथ फड १९०, योगिता अनिल गवळी १९०, ज्ञानेश्वर हरिभाऊ शिराळकर १८८, अनुष्का किसन केदार १८६, प्रणाली गजानन साळुंके १८२, अखिलेश राहुल खाडप १७२, दिनेश सतीश फड १६८, वेदिका बाजीराव वाघमारे १६४आणि रोशन गोपाल सूर्यवंशी याने १६२ गुण मिळविले.

या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक ए. व्ही. पवार, जी. बी. मोरे, जे. जी. कावळे, एन. आर. मुंडे व ए. व्ही. माने यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, सहसचिव राजेंद्र जायेभाये, कोषाध्यक्ष तथा उपप्राचार्या कविता केंद्रे आदींनी कौतुक केले.

## ‘माहेश्वरी’त कोट्यवधींचा अपहार; आरोपी गजाआड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -** येथील माहेश्वरी पतसंस्थेतील शाखाधिकारी व रोखपालाने ८ कोटींहून अधिक रुपयांचा अपहार केला होता. यातील रोखपाल हा गेल्या दीड वर्षापासून फरार होता. अखेर आर्थिक गुन्हे शाखेने त्याला ढोकी येथून अटक केली.

फेब्रुवारी २०२४ मध्ये माहेश्वरी बहुउद्देशिय सहकारी पतसंस्था मर्या., लातूर येथील शाखाधिकारी व रोखपाल याने अपहार केल्याची घटना घडली होती. त्या अनुषंगाने गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यात विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, लातूर यांनी दिलेल्या अहवालानंतर पोलीस तपासाला गती मिळाली. या पतसंस्थेचा व्यवस्थापक, रोखपाल व इतरांनी ८ कोटी १८ लाख ८९ हजार ७०५ रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. फरार रोखपाल सोमनाथ पंडीत हा धाराशिव जिल्ह्यातील ढोकी येथे येणार असल्याची माहिती मिळाली. आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ढोकी येथे साध्या वेषात सापळा लावला. मिळालेल्या माहितीप्रमाणे सोमनाथ हा त्याच्या भावाच्या दुकानात आला. त्याचवेळी पोलिसांनी त्याला गुरुवारी रात्री १० वाजता ताब्यात घेतले. त्यास ७ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनात पुढील तपास चालू असल्याचे सांगण्यात आले.

## बँकेच्या वाटचालीत अनेकांचा मोलाचा वाटा : देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -** आपल्या कार्यातून देशभरात लौकिक प्राप्त केलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या यशस्वी वाटचालीत आजी-माजी कर्मचारी, व गटसचिवांचा मोलाचा वाटा असल्याचे गौरवोद्गार बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांनी काढले

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आजी-माजी कर्मचारी व गटसचिवांच्या स्नेहमेळावा कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, संचालक पृथ्वीराज सिरसाट, राजकुमार पाटील,अनुप शेळके, मारूती पांडे,स्वयंप्रभाताई पाटील,कार्यकारी संचालक एच जे जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.



पुढे बोलताना धिरज विलासराव देशमुख साहेब म्हणाले की, जिल्हा बँकेचे आजी-माजी अधिकारी, कर्मचारी आणि गटसचिव आदींच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे. जिल्हा बँकेच्या स्थापनेपासून ते आजच्या यशस्वी वाटचालीत मोलाचे योगदान देणाऱ्या सर्वांच्या कार्याला याप्रसंगी उजाळा देवून कौतुक केले.

राज्याचे माजी मंत्री सहकारमहर्षी आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर जिल्हा बँक वाटचाल करत आहे.

आपल्या हक्काची लातूर जिल्हा बँक नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे, जिल्हा बँकेने नेहमीच शेतकऱ्यांचा कणा मजबूत करण्याचे कार्य केले आहे. शेतकरी ताठ मानेने चालला पाहिजे, याच विचारातून बँकेचा प्रवास आजही सुरू असल्याचे त्यांनी यावेळी नमुद केले.

लातूर जिल्हा बँक ही आज राज्याच्या अग्रगण्य बँकांपैकी एक आहे. या यशात बँकेचे अधिकारी, कर्मचारी आणि गटसचिव या सर्वांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. कमी मनुष्यबळ असूनही, बँक आपल्या ग्राहकांना उत्कृष्ट सेवा पुरवते आणि पारदर्शक कारभार करते. बँकेने स्वनिधीतून अनेक कल्याणकारी योजना यशस्वीरित्या राबविल्या असे ते शेवटी म्हणाले.

## वॉटर पुरिफायर व वॉटर कुलरचे डॉ. चाकूरकरांच्या हस्ते लोकार्पण



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -** साई फाउंडेशनच्या वतीने बसविण्यात आलेल्या लातूर येथील गांधी चौक पोलीस ठाणे परिसरात आर ओ वॉटर पुरिफायर व वॉटर कुलरचे डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले .

लातूरच्या गांधी चौक पोलीस ठाणे परिसरात पोलीस बांधवांची पिण्याच्या शुद्ध पाण्याची गैरसोय होऊ नये म्हणून साई फाउंडेशन या सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेच्या वतीने ५० लिटर क्षमतेचे आर ओ वॉटर प्युरिफायर व १०० लिटर साठवण क्षमतेचे वॉटर कुलर बसविण्यात आले असून त्याचे लोकार्पण आज भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी यापप्रसंगी पोलीस उपअधीक्षक गजानन भातलवंडे ,पोलीस निरीक्षक साहेबराव नरवडे ,सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, रवींद्र करे, पोलीस उपनिरीक्षक पंडित भंडारे दयानंद आरदवाड, मुरलीधर सूर्यवंशी, राखीताई गायकवाड, गुंडाप्पा अष्टांगे, शितलताई आचार्य पोलीस बांधव कर्मचारी व भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

## कुऱ्हाडीचे घाव घालून पत्नीचा खून करणाऱ्या पतीस जन्मठेप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -** दुचाकी घेण्यासाठी माहेरहून १ लाख रुपये घेऊन ये म्हणत नवविवाहितेवर कुऱ्हाडीचे सपासप घाव घालून खून करणाऱ्या नराधम पतीस जिल्हा न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे, तर सासू-सासऱ्याची निर्दोष मुक्तता झाली आहे.

लातूर तालुक्यातील कासारगाव येथील सुनील घाविट याचा विवाह अंबाजोगाई तालुक्यातील साकुड येथील जनाबाई प्रभाकर भोसले यांच्याशी १२ मे २०२३ रोजी झाला होता. लग्नानंतर ५ महिन्यांनंतर दुचाकी घेण्यासाठी माहेरहून एक लाख रुपये घेऊन ये म्हणत जनाबाई यांचा छळ सुरू झाला. जनाबाई यांच्या पालकांकडून पैशाची मागणी पूर्ण होत नसल्याने जनाबाईचे पती सुनील याने १ ऑक्टोबर २०२३ रोजी मध्यरात्री कुऱ्हाडीने जनाबाईच्या अंगावर सपासप २२ घाव घातले. तर सुनीलच्या आई-वडिलांनी अपघातामध्ये तुमच्या मुलीचा मृत्यू झाल्याचे जनाबाई यांच्या वडिलास सांगितले. मात्र, गेल्या काही दिवसांपासून मुलीचा होत असलेला छळ आणि पैशाच्या मागणीतूनच हे कृत्य झाले आहे. शिवाय, मयत जनाबाईच्या अंगावरील वार यामुळे प्रभाकर भोसले यांनी जनाबाईचा पती सुनील घाविट तसेच त्याचे आई-वडील यांच्या विरोधात लातूर ग्रामीण पोलिसांत गुन्ह्याची नोंद केली. दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर २ मे पर्यंत सुनावणी सुरू होती. पत्नीची हत्या करण्यामागे नेमके कारण काय? अशी विचारणा आरोपी सुनील याला न्यायालयाने केली असता, पत्नी जनाबाई ही घरातील सर्वच सदस्यांना मारुन टाकणार असे म्हणत होती. म्हणून तिलाच संपवल्याचे त्याने सांगितले. तर आरोपीच्या वकिलांनी आरोपी वेडसर असल्याचे म्हटले. पण न्यायालयाने हा दावा फेटाळून लावला. अखेर यावर न्यायालयाने निर्णय दिला असून मयत जनाबाईचा पती सुनील याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली तर त्याच्या आई-वडिलांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. या प्रकरणात एकूण १४ जणांची साक्ष नोंदविण्यात आली. प्रमुख जिल्हा न्यायाधीश व्ही. व्ही. पाटील यांनी ही शिक्षा सुनावली.

## कॉक्सिटमधील टीसीएसच्या कॅम्पस मुलाखतीत १९२ विद्यार्थ्यांना नोकरी

### कॉक्सिटच्या १५३ विद्यार्थ्यांचा समावेश




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -** पदवीधर विद्यार्थ्यांसाठी टीसीएस या नामांकित आयटी कंपनीच्यावतीने येथील कॉक्सिट महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतीतून तब्बल १९२ विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. त्यामध्ये एकट्या कॉक्सिट महाविद्यालयातील तब्बल १५३ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या कॅम्पस मुलाखतीत एकूण ५२४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

येथील कॉक्सिट महाविद्यालयात मागील दोन वर्षांत पदवी उत्तीर्ण व येणाऱ्या शैक्षणिक वर्षात पदवीधर होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी येथील कॉक्सिट महाविद्यालयात आयटी क्षेत्रातील नामांकित टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) कंपनीच्यावतीने कॅम्पस मुलाखती घेण्यात आल्या होत्या. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी ईमेलद्वारे कळविण्यात आली आहे. त्यामध्ये एकूण १९२ विद्यार्थ्यांच्या निवडी झाल्या आहेत. यात एकट्या कॉक्सिट महाविद्यालयातील तब्बल १५३ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या कॅम्पस मुलाखतीसाठी महाराष्ट्रासह कर्नाटक व तेलंगणा राज्यातील एकूण ५२४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

या कॅम्पस मुलाखतीचे उद्घाटन रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष एल. एम. पाटील, टीसीएसचे कॅम्पस मुलाखत प्रमुख विशाल रामपल्ले, कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. विनायक जाधव, माजी प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, टीसीएसचे राहुल गिरी, आकांक्षा मोझर, रोहित फुगे यांच्यासह कॉक्सिटचे उपप्राचार्य डॉ. डी. आर. सोमवंशी, डॉ. व्ही. व्ही. भोसले, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव उपस्थित होते.

## बसवेश्वर महाविद्यालयात कामगार दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे महाराष्ट्र आणि कामगार दिन संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी पुष्पहार अर्पण करून सर्वांच्या उपस्थितीमध्ये विनम्र अभिवादन कले. यावेळी मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कररेड्डी, माजी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील स्टाफ सचिव रवींद्र सुरवसे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्यानंतर प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी ध्वजारोहण केले. त्यानंतर संगीत विभागाचे प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार आणि विद्यार्थिनींनी महाराष्ट्र आणि राष्ट्रभक्तीपर गीत सादर केले.

## गेवराईच्या विद्यार्थ्याची लातुरात आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -** नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या बीड जिल्ह्यातील एका विद्यार्थ्याने लातूर शहरातील बोधेनगरात राहत्या खोलीमध्ये दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना नीट परीक्षेच्या एक दिवस आधी शनिवारी उघडकीस आली आहे.

घटनेचे कारण अद्याप उघडकीस आले नाही. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांत आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस तपास करीत आहेत. अनिकेत अंकुश कानगुडे (वय २०) असे मयत विद्यार्थ्याचे नाव आहे.

लातूर ही शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखली जाते. सबंध महाराष्ट्रासह परराज्यातील लातुरात शिक्षणासाठी तसेच शिकवणीसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही



मोठी आहे. राज्यस्थानमधील कोट्यानंतर लातूरमध्ये सर्वात जास्त डॉक्टर व इंजिनियर्स होण्यासाठी विद्यार्थ्यांचा कल दिवसेंदिवस वाढत चालला आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासाचा ताण सहन न झाल्याने अनेक विद्यार्थी टोकाचे पाऊल उचलतात. असाच काहीसा प्रकार शनिवारी समोर आला आहे. वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणारी नीट परीक्षा रविवारी (दि.४) होणार आहे. मात्र, परीक्षेच्या एक दिवस आधीच अनिकेत अंकुश कानगुडे या वीस वर्षीय विद्यार्थ्याने खोलीमध्ये गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. तो बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील रुई धानोरा येथील रहिवाशी होता.

अनिकेत हा मागच्या दोन वर्षांपासून लातूरच्या एका नामांकित शिकवणीमधून नीट परीक्षेची तयारी करत होता. दरम्यान, मागच्या वेळी त्याला ५२० च्या जवळपास गुण मिळाले. मात्र, वैद्यकीय प्रवेश मिळाला नाही. पुन्हा तो नीट परीक्षेची तयारी करत होता. परंतु, परीक्षेच्या एक दिवस आधीच त्याने आत्महत्या केली. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलीस गुन्ह्याचा तपास करत आहेत.

# खरीप हंगामाची पेरणी सुरु होण्यापूर्वी शेतकऱ्यांना बियाणे, खते व पीक कर्ज, उपलब्ध करुन द्या-पालकमंत्री पंकजा मुंडे

## जिल्ह्यात खरीप हंगामात ६ लाख २९ हजार हेक्टरवर होणार पेरणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

खरीप हंगामातील पेरण्या सुरु होण्यापूर्वी शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते व पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी आतापासूनच योग्य नियोजन करण्याचे निर्दे राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसवंर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी यावेळी दिले.जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात खरीप हंगामपूर्व तयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्रीमती मुंडे या बोलत होत्या. यावेळी खासदार कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार बबनराव लोणीकर, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण, आमदार राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, प्रभारी जिल्हा पोलीस अधीक्षक आयुषकुमार नोपाणी, अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मैत्रवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, विभागीय कृषी सहसंचालक पी.आर. देशमुख, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी जी. आर. कापसे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, कृषी विभागाने यावर्षी खरीप हंगामातील पेरणीचे प्रस्तावित क्षेत्राच्या प्रमाणात बियाणे रासायनिक खते शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. तसेच




पावसाअभावी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येवू नये. पुरेसा पाऊस झाल्यावरच शेतकऱ्यांनी पेरणी करावी. यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यामध्ये व्यापक जनजागृती करावी. तसेच पीक पेरणीची योग्य पद्धत, बियाणांची निवड आणि पेरणीपूर्व प्रक्रिया, पेरणीचा योग्य कालावधी आदीबाबतीची माहिती शेतकऱ्यांना द्यावी. शेतकऱ्यांपर्यंत अत्याधुनिक तंत्र पोहोचविण्यासाठी क्षेत्रिय कर्मचारी आणि शेतकऱ्यांनी समन्वय ठेवावा. शेतक-यांना विविध पिकांच्या पेरणीची योग्य वेळ आणि पद्धत, त्या पिकांवर येणारे रोग आणि त्याअनुषंगाने करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी सविस्तर माहिती देण्यासाठी कृषी विभागाने विशेष मोहीम राबवावी. जमिनीची उत्पादकता वाढवून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळेल यासाठी प्रयत्न करावा. जिल्ह्यात बोगस बियाणे आणि रासायनीक खतांची विक्री होवू नये, यासाठी पथके स्थापन करुन, दोषींवर कायदेशीर कारवाई करावी. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त होताच पंचनामे करुन बियाणे नमुने तपासण्यापेक्षा बियाणे पुरवठादारांकडील साठे तपासून त्याचवेळी त्याची गुणवत्ता तपासावी. तसेच जादा दराने खत विक्री करणे, खतांचा साठा करून ठेवणे, असे अवैध काम करणाऱ्या विक्रेत्यांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी व त्यांच्या तक्रारींच्या निराकरणासाठी योग्य उपाययोजना कराव्यात. तसेच खरिप हंगामाकरीता शेतकऱ्यांना बँकेच्या माध्यमातून होणारे कर्ज वितरणाचे उद्दिष्ट हे जून पर्यंत पूर्ण करावे. शेतकऱ्यांना बँकेत चकरा माराव्या लावू नये याची दक्षता घ्यावी. तसेच पात्र लाभार्थ्यांना पंतप्रधान कुसुम योजना आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजनाचा लाभ वेळेत मिळावा यासाठी नियोजन करावे. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना अंतर्गत लाभार्थ्यांना वेळेत लाभ देण्यात यावा अशा सूचना पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी संबंधीतांना दिल्या. तसेच जिल्ह्यातील ज्या गावातून टँकरची मागणी होताच, त्या गावास तात्काळ पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच टँकर, पुरक नळ योजना, विहिर अधिग्रहण इत्यादी उपाययोजनांद्वारे सर्वसामान्य नागरिकांना पाणी टंचाईचा त्रास होणार नाही याची जिल्हा प्रशासनाने दक्षता घ्यावी असे निर्दे श ही पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले. जिल्ह्यात ६ लाख २९ हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाच्या पेरणीसाठी नियोजन आज सादर करण्यात आले. त्यात सर्वाधिक क्षेत्रावर म्हणजेच २ लाख २१ हजार हेक्टरवर सोयाबीन तर २ लाख ९१ हजार हेक्टर क्षेत्रावर कापूस या पिकांचे नियोजन करण्यात आले आहे. कापूस आणि सोयबीन पिकासाठी बियाण्यांची उपलब्धता करण्यात आली आहे. जिल्ह्यात कापूस पिकाच्या नियोजित क्षेत्रावर पेरणीसाठी बियाण्यांची ११ लाख ५१ हजार पाकिटे लागणार आहेत. त्याचे नियोजन करण्यात आले असून, सोयाबीन पिकासाठी ६५ टक्के घरच्या बियाण्यांचा वापर होणार आहे. तसेच उर्वरीत ३५ टक्के म्हणजे ५७ हजार ५६५ क्विंटल बियाण्यांचे नियोजन करण्यात आले आहे. सोबतच खरीप ज्वारी, मुग, तूर, उडीद, भुईमूग, सूर्यफुल, तीळ या पिकांच्या पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. या सर्व पिकांच्या लागवडीसाठी ७३ हजार ०७६ क्विंटल बियाण्याची आवश्यकता असून, त्याची मागणी नोंदविण्यात आली आहे. तसेच खरिप हंगामाकरीता आवश्यक व अपेक्षित बियाणे, खते, किटकनाशके यांचे योग्य नियोजन कृषी विभागामार्फत करण्यात आल्याचे यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जी. आर. कापसे यांनी सांगितले. बैठकीच्या प्रारंभी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते जालना कृषी विभागाच्या व्हॉटस् अप चॅनल आणि घडिपत्रिकाचे विमोचन करण्यात आले. यावेळी बैठकीस उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक प्रेषीत मोघे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परमेश्वर वरखडे, कृषि विकास अधिकारी प्रभाकर बनसावडे, सर्व उपविभागीय कृषी अधिकारी व सर्व तालुका कृषि अधिकारी यावेळी उपस्थिती होते.

संक्षिप्त

## डॉ.सुरेखा संजय लहाने यांना राजमाता जिजाऊ राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद /प्रतिनिधी**



जाफ्राबाद नगरीच्या नगराध्यक्ष डॉ .सुरेखा संजय लहाने यांचे व्याख्यानाच्या माध्यमातून अविस्मरणीय सामाजिक कार्य केले आहे. व तसेच त्यांचे सामाजिक कार्य उल्लेखनीय आहे या अनुषंगाने अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने एकविसाव्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन ९ व १० मे २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात कराड येथे आयोजित केलेले आहे लोकनेते मा.शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन होणार असून त्यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार देण्यात येणार आहे तरी मोठ्या संख्येने साहित्यिक व विचारवंत या संमेलनास उपस्थित राहणार आहे सदर पुरस्कार जाफ्राबाद नगरीच्या नगराध्यक्ष डॉ.सुरेखा संजय लहाने यांना राष्ट्रमाता जिजाऊ राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार मिळाल्या बद्दल यांचे हार्दिक अभिनंदन खा.सुप्रियाताई सुळे,राजेश टोपे ,रोहित पवार,चंद्रकांत दानवे, संजय लहाने,रामधन कळंबे, दामू अण्णा वैद्य, विद्या देशमुख,सिंधू दांडगे,सिंधू दिवटे,मनीष श्रीवास्तव, फइम खासाब, साबेद चाऊस,रवी,हर्षवर्धन जाधव,उमेश दुनगहू ,कैलास लोखंडे,सर्जेराव मरकड, विनोद खेडेकर,कैलास सुसर, भरत लहाने व सर्वच स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येते आहे.

## जैन साधूचा अवमान करणाऱ्या फेसबुक पोस्टविरोधात भोकरदन पोलीस ठाण्यात सकल जैन समाजाच्यावतीने तक्रार दाखल

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**



एका दिगंबर जैन साधूच्या छायाचित्रात मोबाईलद्वारे छेडछाड करून अपमानास्पद स्वरूपात फेसबुकवर पोस्ट केल्याच्या प्रकरणी सकल जैन समाज, भोकरदन यांच्यावतीने भोकरदन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, आरोपी ज्ञानेश्वर भगाजी गाढे यांनी साधूच्या मूळ फोटोत मोर्किंग करून तो त्यांच्या वैयक्तिक फेसबुक प्रोफाइलवर अपमानास्पद मजकुरासह पोस्ट केला. या कृतीमुळे जैन समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या असून साधूच्या प्रतिमेचा अवमान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. ''सदर कृत्य धार्मिक तेढ निर्माण करणारे असून कायद्यानुसार गुन्हा आहे. आरोपीवर भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमांन्वये कठोर कारवाई करण्यात यावी,'' अशी मागणी सकल जैन समाज, भोकरदन यांच्याकडून करण्यात आली आहे. या संदर्भात प्रतिक्रिया देताना भोकरदन पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सागर शिंदे यांनी सांगितले की, ''तक्रार प्राप्त झाली असून या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे. योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन देखील पोलीस प्रशासनाच्या वतीने यावेळी देण्यात आले .



डोंगर सिंग पुरोहित यांच्या 'राजमीलन मिठाई सेंटर' चा उद्घाटन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी जालना शिवसेना शहर प्रमुख, नगरसेवक व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विष्णूभाऊ पाचफुले,जालना मर्चंट बँकेचे संचालक अंकुश सेठ राऊत महाराज किशोर तिवारी समाजसेवक मेघराज भैया चौधरी , मुक्तेश्वर तिवारी, आणि यांची उपस्थिती होती. उपस्थित सर्व मान्यवरांनी डोंगर सिंग पुरोहित यांना पुढील यशस्वी व्यवसायासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या...!

# किराणा व्यापाऱ्याच्या घरी पंचवीस तोळे सोन्याच्या दागिन्याची चोरी ; रिकवरी मात्र आठ तोळ्याची

## आरोपीस सहकार्य करणाऱ्या दांपत्यास व सराफा व्यापाऱ्यांना पोलिसांकडून क्लीन चीट

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**

मंठा शहरातील मेन रोडवरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील किराणा व्यापारी मोहन अग्रवाल यांच्या घरी शनिवारी रात्री चोरी झाल्याची घटना समोर आली. यात चोरी गेलेल्या २५ तोळे सोन्याच्या दागिन्यापैकी आठ तोळ्याचे दागिने रिकव्हर झाल्याची माहिती पोलिसांनी पत्रकारांना दिली. परंतु २५ पैकी आठ तोळेच कसे रिकव्हर होतात बाकी का नाही ? यासह तपासामध्ये १२ सराफा व्यापारी आणि दोनच व्यापारी कागदावर घेतले , बाकीच्यांना का सुट अशी देखील चर्चा शहरात होत आहे. याप्रकरणी सविस्तर वृत्त असे की , मंठा शहरातील मोहन किराणा या दुकानांमध्ये काम करणाऱ्या नोकराने २५ तोळ्याचे सोन्याचे दागिने लंपास केले. याप्रकरणी मंठा पोलीस ठाण्यात सचिन उर्फ बबलू घोडे राहणार पांगरी बुद्रुक याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरीचा घटनेनंतर पोलीस उपनिरीक्षक संतोष माळगे व त्यांचे सहकारी पोलीस कॉन्स्टेबल विलास कातकडे यांच्याकडे तपासाची सूत्रे आली. त्यानंतर यांनी तपासाची सूत्रे फिरवून मंठा शहरातील १२ सराफा व्यापारी यामध्ये असल्याची दिवसभर चर्चा व त्यांना देखील पोलीस ठाण्यात चौकशीसाठी बोलवून घेतले होते. तसेच आरोपी सचिन घोडे यास मदत करणारे वाघमारे दांपत्य त्यांना देखील पोलिसांनी चौकशीसाठी बोलून घेतले यासह सचिन घोडे याच्या अन्य साथीदार वाघमारे दांपत्ये , गवळी , वायाळ , शिवपुरे यांची देखील चौकशी झाली. या सर्व चौकशीनंतर पोलिसांना आठ तोळ्याची रिकवरी प्राप्त झाली. मात्र २५ तोळे लंपास दागिन्यापैकी आठ तोळ्याची रिकवरी कशी , यासंदर्भात विविध चर्चा शहरात रंगत आहे. यासह या प्रकरणांमध्ये सराफा व्यापारी यांना आरोपी न करता साक्षीदाराच्या यादीत टाकले जाते तसेच यात घोडे यांना सहकार्य करणाऱ्या सर्व जणांना पोलिसांकडून क्लीन चीट देण्यात येते हे मात्र संशयास्पद दिसते !

या प्रकरणांमध्ये नागरिकांच्या विविध चर्चेने पोलीस प्रशासनाची प्रतिमा अत्यंत मलीन होताना दिसत आहे. त्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी या प्रकरणांमध्ये विशेष लक्ष घालून सदर तपास हा स्थानिक गुन्हे शाखेकडे द्यावा अशी मागणी होत आहे. या अगोदर देखील अनेक चोरीच्या घटना घडल्या आहेत त्याचा देखील तपास असाच गुलदस्त्यात आहे.

> विशेष म्हणजे शहरांमध्ये सोन्या चांदीच्या दागिन्याच्या चोऱ्या होतात.आणि ते दागिने मंठ्यातीलच सराफा व्यापाऱ्यांना विक्री केले जातात , तरी देखील पोलीस प्रशासन यावर कार्यवाही करत नसल्याने नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाबद्दल नाराजी व्यक्त केली जात आहे. स्थानिक सराफा व्यापारी हेच चोरीची सोने विकत घेत असल्यामुळे मंठा शहराचा तालुक्यामध्ये चोरीचे प्रमाण वाढले आहे.

## अरुण जाधव यांना गुणवंत गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्कार प्रदान.

**तभा वृत्तसेवा**
**परतूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदवाडी येथे तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असणारे अरुण कारभारी जाधव यांना गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्कार देण्यात आला. कामगार दिनानिमित्त संभाजीनगर विभागाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट साहेब यांच्या हस्ते अरुण जाधव याना पुरस्कार प्रदान करण्यात आला. कामगार दिनानिमित्त महावितरणच्या वतीने विभागीय गौरव सोहळा घेण्यात आला. याप्रसंगी तंत्रज्ञ अरुण कारभारी जाधव यांनी आनंदवाडी व परतूर शहरात महावितरण मध्ये महावितरणच्या परिमंडळात काम करीत असताना वर्ष २०२४-२५ मध्ये अविरत विना अपघात सुरळीत विज सेवा, रोहित्राची काळजी, अचानक उद्भवणाऱ्या तांत्रिक समस्येचे निराकरण करणे, कामाच्या ठिकाणची देखभाल, इत्यादी क्षेत्रात कर्तव्य दक्षता, निष्ठा व श्रम दाखवून उल्लेखनीय कार्य केले. या कामगिरीबद्दल श्री. कछोट यांच्या हस्ते अरुण जाधव यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले आहे. तंतज्ञ अरुण जाधव यांना गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्कार मिळाल्या बद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# शेतकऱ्यांचे अतिवृष्टी, पूर व गारपिटीचे ५६ कोटी रुपयांचे सानुग्रह अनुदान हडप करणाऱ्या दोन्ही उपविभागीय अधिकारी व चारही तहसीलदारांवर तात्काळ कारवाई करा : आ . लोणीकर यांची मागणी

### खताची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा कृषी अधीक्षक यांची भूमिका महत्त्वाची - आमदार बबनराव लोणीकर

### शेतकऱ्यांना वेठीस धरू नका; वाढीव दराने खत किंवा बियाण्यांची विक्री केल्यास कृषी सेवा केंद्र चालकाबरोबरच डीलर आणि सब डीलर यांच्यावरही गुन्हे दाखल करण्यात यावेत - आमदार बबनराव लोणीकर

### गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेमधील कठोर अटी शिथिल करण्यासह २२५ मंजूर असलेल्या परंतु निधी अभावी प्रलंबित प्रकरणांना निधी उपलब्ध करून द्या - आमदार बबनराव लोणीकर यांची मागणी

### बोगस खते व बियाण्याची विक्री करणाऱ्यांबरोबरच बोगस बियाणे निर्माण करणाऱ्या कंपन्यांवर देखील गुन्हे दाखल करण्यात यावेत - लोणीकरांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

अतिवृष्टी, पूर व गारपिटीमुळे जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्या शेतकऱ्यांना शासनाकडून कोट्यवधी रुपयांचे सानुग्रह अनुदान मंजूर देखील झाले. त्या अनुदानापैकी प्रथमदर्शनी ५६ कोटी रुपये अंबड व भोकरदन हे दोन्ही उपविभागीय अधिकारी आणि अंबड, घनसावंगी, भोकरदन व जाफराबाद या चार तहसीलदारांच्या संगनमताने तहसीलदारांचे लॉगिन वापरून हडप करण्यात आले आहेत. चुकीच्या पद्धतीने शेती नसलेले किंवा बीड, अहिल्यानगर व बुलढाणा यासह इतर रहिवाशी असणाऱ्या नातेवाईकांची नावे गावातील शेतकऱ्यांच्या यादीत समाविष्ट करून किंवा काही ठिकाणी दुबार नावाचा वापर करून शासकीय अनुदान लाटण्यात आले. ही रक्कम ५६ कोटी वरून १०० कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे त्यामुळे संबंधित तलाठी ग्रामसेवक कृषी सहायक यांच्याबरोबरच दोन्ही उपविभागीय अधिकारी व चारही तहसीलदार यांच्यावरही कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली आहे.पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व बैठक दरम्यान आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. यावेळी आमदार अर्जुन खोतकर खासदार कल्याण काळे, आमदार नारायण कुचे आमदार हिकमत उढान, आमदार राजेश राठोड, आमदार संतोष दानवे, जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ यांच्यासह सर्व विभागांचे विभाग प्रमुख अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, काही तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायकांनी संयुक्तरीत्या पाहणी करून झालेल्या नुकसान भरपाई चा अहवाल शासनाकडे सादर करणे अपेक्षित आहे हा अहवाल तहसीलदार यांच्या लॉगिन वरून उपविभागीय अधिकारी व त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवला जातो परंतु या नुकसान भरपाईची पाहणी करत असताना तलाठी ग्रामसेवक व कृषी सहाय्यक अशी त्रिसदस्य समिती असताना केवळ तलाठी केवळ ग्रामसेवक किंवा केवळ कृषी सहाय्यक यांनी एकट्यानेच पाहणी दौरा केला व इतर दोघांनी त्यावर केवळ स्वाक्षरी केली असे देखील निदर्शनास आले आहे परिणामी चुकीच्या पद्धतीने बोगस नावे समाविष्ट करण्यात आली आहेत ही बाब तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक यांच्यासह तहसीलदार किंवा उपविभागीय अधिकारी यांनी कोणीही फेर तपासणी न करता थेट अहवाल जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे सादर केला आहे. कामात हलगर्जीपणा केल्यामुळे हा प्रसंग निर्माण झाला असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.घनसावंगी, अंबड, जाफराबाद व भोकरदन या तालुक्यांत १२,००० बोगस शेतकरी दाखवून त्यांच्या नावावर सानुग्रह अनुदान वितरित करण्यात आले व त्यानंतर ती रक्कम संबंधितांच्या खात्यावरून काढण्यात आली. त्यासाठी त्यांनी तहसीलदारांच्या लॉगिन व पासवर्ड वापरला. अपहारासाठी जालना जिल्ह्यात बीड, अहिल्यानगर, बुलाडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची नावे अनुदान यादीत घुसवण्यात आली आहेत. विशेष म्हणजे एकाच शेतकऱ्याचे नाव अनेकदा वापरून दुबार नावाचा वापर करत मोठी रक्कम हडप करण्यात आली आहे. त्याचबरोबर गायरान जमिनीवर किंवा पडीक जमिनीवर बाहेरच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांची नावे समाविष्ट करून अनुदान उचलण्यात आले आहे. जिल्हाभरात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची संख्या मोठी व शासनाकडून याद्या अपलोड करण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्यामुळे तहसीलदारांचे लॉगिन व पासवर्ड वापरून काही तलाठी ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांनी संबंधित तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्याशी संगणमताने बोगस नावे समाविष्ट करण्यात आली आहेत असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले. तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी अपलोड करण्यात आलेल्या याद्यांची फेरतपासणी न केल्यामुळे थेट डीबीटीद्वारे संबंधितांच्या बँक खात्यात पैसेही जमा झाले. तलाठी ग्रामसेवक व कृषी सहाय्यक या त्रि सदस्य समितीने अपलोड केलेल्या याद्यांची खातरजमा मंडळ अधिकारी, तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी यांनी करणे अपेक्षित होते. परंतु असे करण्यात आलेली नाही एकट्या अंबड, घनसावंगी तालुक्यात ५६ कोटी रुपये सानुग्रह अनुदान बोगस लाभार्थींच्या नावे जमा झाल्याचे समोर आले आहे. ही रक्कम संबंधित दोन्ही उपविभागीय अधिकारी व चारही तहसीलदार यांच्याकडून वसूल करण्यात यावी अशी मागणी देखील आमदार लोणीकर यांनी केली आहेशेतकऱ्यांना वेठीस न धरता खताची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा कृषी अधीक्षक यांची भूमिका महत्त्वाची असून वाढीव दराने डीलर खतांची खरेदी करतो त्यामुळे वाढीव दराने सब डीलर ला विक्री केली जाते पुढे सब डीलर कृषी सेवा केंद्रांना आणि कृषी सेवा केंद्र शेतकऱ्यांना अधिकचे पैसे घेऊन कृत्रिम टंचाई निर्माण करत खताच्या मूळ किमतीपेक्षा अधिकच्या दराने विक्री करून शेतकऱ्यांची लुबाडणूक करतात ही बाब अत्यंत गंभीर असून यामध्ये केवळ कृषी सेवा केंद्र चालकावर कारवाई केली जाते असे न करता कृषी सेवा केंद्र चालकासह डीलर आणि सब डीलर यांच्यावर देखील तितक्याच गंभीर स्वरूपाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली. यासाठी राज्य कृषी विभाग जेवढा जबाबदार आहे तेवढाच जिल्हा परिषद कृषी विभाग देखील जबाबदार आहे असेही आमदार लोणीकर यावेळी म्हणाले.पेरणीला सुरुवात होण्यापूर्वी भेसळयुक्त खते व बोगस बियाणे याची बाजारात मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते. परिणामी संबंधित बियाण्याची उगवण शक्ती पूर्ण आहे किंवा नाही या सदर्भात बियाणे महामंडळाने सतर्क राहून तपासणी करणे अपेक्षित आहे. असे स्पष्ट करत मागील काळात बियाणे महामंडळाच्या जालना कार्यालयाने जालना छत्रपती संभाजी नगर अहिल्यानगर व बीड या चार जिल्ह्यांमध्ये ३० हजार टन बोगस बियाणे विक्री केले होते त्याचप्रमाणे परभणी बियाणे महामंडळाच्या कार्यालयाने हिंगोली परभणी लातूर सोलापूर व धाराशिव या पाच जिल्ह्यांमध्ये ३५ टन बोगस बियाणे विक्री केली होती याची आठवण करून दिली. तसेच जालना व भोकरदन या दोन ठिकाणी माती मिश्रित खतांचे कारखाने सुरू करण्यात आले होते त्यावर देखील मागील काळात कारवाई करण्यात आली असल्याचे लोणीकरांनी निदर्शनास आणून दिले त्यामुळे यापुढे माती मिश्रित खते निर्मिती करणारे कारखाने व विक्री करणारे दुकानदार यांच्यासह बोगस बियाण्याची विक्री करणारे आणि बोगस बियाणे निर्माण करणाऱ्या कंपन्यांवर देखील फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी आमदार लोणीकर यांनी केली.सद्यस्थितीत प्रचंड उन्हाळा असून शेतीसाठी जनावरांसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी प्रचंड वणवण करावी लागत आहे अशा परिस्थितीत गोदावरी नदीवरील राजा टाकळी जोगलादेवी व लोणी सावंगी हे तीनही



उच्च पातळी बंधारे कोरडे पडले असून यामध्ये तात्काळ पाणी सोडण्यात यावे अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी या बैठकीदरम्यान केली. तसेच गोदावरीतील उच्च पातळी बंधाऱ्यांसह अंबड ते कासापुरी पर्यंतच्या चाऱ्यांना देखील पाणी सोडण्यात यावे अशी मागणी लोणीकरांनी केली. टंचाईच्या काळात जिल्हाधिकारी यांना या संदर्भातील अधिकार असून जिल्हाधिकाऱ्यांनी गोदावरी खोरे महामंडळाकडे तात्काळ मागणी करून उच्च पातळी बंधार्यांसह चार क्रमांक ३८, ३९, ४० व ४१ मध्ये तात्काळ पाणी सोडण्यात यावे. चारी क्रमांक ४० वरील शेतकऱ्यांनी नऊ लाख रुपयांचा भरणा केला असून या संदर्भात कार्यकारी अभियंता श्री जाधव यांच्याशी प्रत्यक्ष बोलणे झाले आहे परंतु असे असले तरी जिल्हाधिकाऱ्यांनी गोदावरी खोरे महामंडळाकडे तात्काळ मागणी करून च्च पातळी बंधार्यात व या चारही चाऱ्यांमध्ये पाणी सोडण्या सदर्भात व्यवस्था करावी अशी सूचना आमदार लोणीकर यांनी केली.अपघातामध्ये शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यास लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे अपघात विमा योजनेअंतर्गत मदत केली जाते परंतु ही मदत करत असताना या योजनेमधील कठोर अटी व नियमावली मुळे शेकडो शेतकरी कुटुंबीय वंचित राहत आहेत यामध्ये तालुकास्तरावर जिल्हा सरावर व राज्यस्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या दिरंगाईमुळे व यामधील जाचक अटींमुळे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबीयांना याचा लाभ मिळत नाही परिणामी यामधील अटी शिथिल करून अधिकाधिक अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत व्हावी यासाठी प्रयत्न करावेत. जालना जिल्ह्यामध्ये २२५ प्रकरणे मागील अनेक दिवसांपासून प्रलंबित असून प्रकरण मंजूर असताना देखील अद्याप पर्यंत मदत मिळालेली नाही या सर्व प्रकरणांना तात्काळ निधी उपलब्ध करून देण्यात यावा व जाचक अटी रद्द करण्यात यावे अशी मागणी सुद्धा आमदार बबनराव लोणीकर यांनी या बैठकीदरम्यान केली.

# दारूच्या नशेत बापाने डोक्यात दांडा मारून केला लेकाचा खून




**पंधरा दिवसात तिसऱ्या खुनाने माजलगाव हादरल**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.४ मे**

जन्मदात्या बापाने दारूच्या नशेत पोटच्या लेकाचा बाजेचा माचवा डोक्यात घालून खुन केल्याची खळबळजनक घटना शहरालगत असलेल्या ब्रह्मगावात रविवार दि.४ रोजी सकाळी दहा वाजण्याच्या दरम्यान घडली. शहरात पंधरा दिवसात लागोपाठ घडणाऱ्या या तिसऱ्या खुनाच्या घटनेने माजलगाव हादरलं आहे.

रोहीत गोपाळ कांबळे ( वय २१ वर्ष) असे मयत तरूणाचे नाव असून गोपाळ विठ्ठल कांबळे (वय ४६) असे आरोपी बापाचे नाव आहे.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार मयत मुलगा आणि आरोपी असलेला बाप या दोघांनाही दारूचे व्यसन होते. दोघांमध्ये नेहमीच कुरबुरी होत होती.आठ दिवसांपुर्वीच रोहीत कांबळे याने गळफास घेऊन आत्महत्येचा देखील प्रयत्न केला होता अशी चर्चा आहे.आज सकाळी दोघेही दारूच्या नशेत असतानाच पुन्हा त्यांच्यात वाद झाला.यावेळी बापाने रागाच्या भरात जवळच पडलेला लाकडी बाजेचा माचवा (बाजेचा पाय) डोक्यात घालून पोटच्या मुलाचा खून केला.

दरम्यान सदरील घटनेची माहिती पोलिसांना मिळतात घटनास्थळी माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहूल सुर्यतळ, पोलीस पोउपनि माकणे व इतर पोलीस कर्मचारी पोहचले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून शव उत्तरीय तपासणीसाठी माजलगाव ग्रामीण रुग्णालयात पाठवले आहे.आरोपीला पोलीसांनी घटनास्थळाहून अटक केली आहे.प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

दरम्यान १५ एप्रिल रोजी भाजपचे कार्यकर्ते बाबासाहेब आगे या तरुण युवकाचा भर रस्त्यात खून करण्यात आला होता.तर २०एप्रिल रोजी महादेव गायकवाड या ढाबा चालकाचा खून करण्यात आला होता.आज जन्मदात्या बापाकडूनच पोटच्या मुलाचा खुन केल्याची घटना घडली असून एका पाठोपाठ घडणाऱ्या खुनाच्या घटनेमुळे माजलगाव शहर हादरलं आहे.

## इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कुल युसुफ राम वडगाव शिष्यवृत्ती परिक्षेत घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.४ मे**

केज तालुक्यातील युसुफ राम वडगाव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परिक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील युसुफ राम वडगाव सारख्या ग्रामीण भागात उच्च दर्जाचे शिक्षण देणारी संस्था म्हणून नावारूपाला आलेल्या इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती च्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले, शाळेतील शिष्यवृत्ती परीक्षेस बसलेल विद्यार्थी मोठ्या संख्येने यशस्वी झाले आहेत. यामध्ये प्रतीक राजाभाऊ थळकरी, श्लोक अनंत थळकरी, अवनी अरुण नांदे, समृध्दी सुधाकर वाळके, कल्याणी गणेश मोरे, सर्वेश चंद्रकांत थळकरी या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत विषेश प्रावीण्य मिळविले आहे.अशाच प्रकारे शैक्षणीक वर्ष २०२४-२५ मध्ये एम .टी.एस. परीक्षे मध्ये शाळेने घवघवीत यश संपादन केले, त्याबद्दल पालक समाधान व्यक्त करत असून शाळेचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे, की ग्रामीण भागात उच्च प्रतीचे शिक्षण देऊन विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परिक्षे बाबत आवड निर्माण करण्याचे काम शाळा करत आहे.ग्रामीण भागात सुद्धा शाळा चांगली आसेल तर विदयार्थी घडतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल युसुफ राम वडगांव गुणवत्ता पूर्ण, परिपूर्ण शिक्षण देण्यासाठी नावाजलेली शाळा असून आजच्या स्पर्धेच्या युगात आपला विद्यार्थी टिकला तर पाहिजे, पण त्याने यश हि संपादन केले पाहिजे यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मेहनत घेत असतात.

# केज येथे श्री स्वामी समर्थ मठाच्या सार्ध शतकपुर्तीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.४ मे**



श्री स्वामी समर्थ मठ केज येथील श्री स्वामी समर्थांच्या पादुका स्थापनेला दिडशे वर्ष (शतकोत्तर सुवर्ण महोत्सव) पुर्ण होत आहेत. त्या निमीत्त विश्वशांती व विश्व कल्याणासाठी पंचायतन यज्ञाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

दि.५ मे ते १२ मे या कालावधीत श्री स्वामी समर्थ मठामध्ये पंचायतन यज्ञ होणार आहे. यामध्ये पाच यज्ञ कुंड असणार आहेत. श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ या पंचदशाक्षरी नाम जपा चा दि.१४ डिसेंबर २०२४ (दत्त जयंती) या शुभ दिवसापासुन दिड कोटी जपाचा संकल्प करुन सुरुवात करण्यात आलेली होती. या नाम जपामध्ये केज शहर व परिसरातील सर्व स्वामी भक्त, सर्व समाजातील महिला पुरुष, युवक, युवती सहभागी झाले होते. त्यास महिला वर्गातून उस्फुर्त प्रतिसाद मिळालेला आहे. या पंचायतन यज्ञामध्ये श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ या पंधरा लाख नाम जपाचा स्वाहाकार होणार आहे. प्रधान आचार्य श्री.श्रीराम रघुनाथबुवा जोशी यांच्या अधिपत्याखाली व वेदशास्त्र संपन्न ब्रम्ह वृंदाच्या मार्गदर्शना खाली सर्व धार्मिकविधी संपन्न होणार आहेत. यात दररोज सकाळी ५.३० वाजता काकडा आरती, सकाळी ६.०० ते ७.०० श्री स्वामी समर्थांना लघु रुद्राभिषेक,७.३० ते १२.०० यज्ञ स्वाहाकार,१२.३० नैवेद्य व महाआरती, तसेच दुपारी ४.०० ते ६.०० ह.भ.प. श्री.भालचंद्र देवा यांच्या मधुर वाणीतुन श्री स्वामी समर्थ कथामृत, तसेच सायंकाळी ७.०० ते ८.०० महाआरती व उपासना, सायंकाळी ८.३० ते ११.३० विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये पंडित शौनक अभिषेकी, पंडित जयंत केजकर, इंडियन आयडॉल धनश्री देशपांडे व राजश्री लेले, तसेच स्वरसरित सरिता परांडेकर यांचे भक्ति संगित-नाटय संगित, कि र्त ना चा य ह.भ.प.डॉ.श्री.चारुदत्त आफळे, व ह.भ.प.किर्तन सम्राट समाधान महाराज शर्मा यांचे किर्तन व अभिजित धर्माधिकारी यांचे अंर्तमुख होणारे प्रवचन, मगरमिठी भजनी मंडळ कोल्हापुर यांचे भजन होणार आहे. दि.१२ मे रोजी यज्ञाची पुर्णाहुती व दुपारी १.०० ते ५.०० महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा लाभ सर्व स्वामी भक्त व नागरिकांनी घ्यावा असे आवाहन श्री स्वामी समर्थ मठ संस्था व पं.पु.श्रीमंत नानासाहेब महाराज देशपांडे प्रतिष्ठाण केज व समस्त केजकर देशपांडे व स्वामी समर्थ भक्तांच्या वतीने करण्यात आले आहे.

## केज येथे जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त रुग्णांना फळे वाटप




**तभा वृत्तसेवा**
**केज दि.४ मे**

जागतिक पहिल्या भारतीय संसदेचे जनक, आदर्श प्रशासक , समतानायक, क्रांतीसुर्य , जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या ९२० व्या जयंती निमित्त केज येथे प्रतिमा पूजन करण्यात आले. जयंतीचे औचित्य साधून उपजिल्हा रुग्णालय केज येथे रुग्णांना फळे वाटप करण्यात आले.यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ सचिन राऊत,डॉ चाटे, डॉ आशिष मुळे,डॉ हनुमंत सौदागर, दिनकर राऊत,रमेश इतापे, मन्मथ माऊली सेवा प्रतिष्ठान चे अध्यक्ष डॉ.वैजनाथ शेटे , सचिव उमाकांत बोधने ,चंद्रशेखर शेटे ,भाग्येश अन्नदाते, वैजनाथ हलगे ,मल्लिकार्जुन स्वामी आदींची उपस्थिती होती.सामाजिक उपक्रमातून जयंती साजरी करण्यात आली. महात्मा बसवेश्वरांनी अंधश्रद्धा अनिष्ट रूढी परंपरा याविरुद्ध बंड करून विद्रोह केला होता. महात्मा बसवेश्वरांचे विचार सर्वांनी आत्मसात करावेत असे मत उपस्थितांनी व्यक्त केले व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्वांनी परिश्रम घेतले.

## माजलगावात चोरट्यांनी तीन दुकानं फोडली
### सतत होणाऱ्या चोऱ्यामुळे व्यापारी दहशतीखाली




**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.४ मे**

माजलगाव शहरात वर्दळीच्या ठिकाणी असणाऱ्या तीन दुकानांचे शटर चोरट्यांनी तोडले आहेत.या घटना रविवारी पहाटे तीन साडेतीनच्या दरम्यान घडल्या आहेत.दरम्यान सतत होणाऱ्या चोऱ्यांमुळे माजलगावातील व्यापारी दहशतीमध्ये आहे.

माजलगावात चोरीचे सत्र सुरूच आहे.काही दिवसापूर्वीच मोंढ्यात घडलेली चोरीची घटना ताजी असतानाच आज रविवारी पहाटे बीड रोड या मुख्य रस्त्यावर असणाऱ्या खुर्शिद कुरेशी यांच्या सिटी बिर्याणी हाऊस या हॉटेलचे शटर तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला.दुकानात मौल्यवान वस्तूसह कॅशकाहीच मिळाले नाही.त्याचवेळी चोरट्यांनी बाजूलाच असणाऱ्या पठाण यांच्या होनेस्टि मेन्स वेअर कपड्याच्या दुकानाचे शटर तोडन्याचा प्रयत्न केला.तर गजानन मंदिर रोडवर धपाटे यांचे ज्ञानेश्वरी मेडिकलचे शटर तोडून चोरट्यांनी दुकानातील सीसीटीव्ही चा डीव्हीआर व गल्ल्यात असणारे पाच हजार रुपये रोकड लंपास केली आहे.सदरील ठिकाणी पोलिसांनी भेटी दिल्या आहेत.. अज्ञात चोरट्या विरोधात पोलिसांमध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान नेहमीच घडणाऱ्या चोऱ्याच्या घटनांनी व्यापारी दहशतीमध्ये असून याबाबत व्यापाऱ्यांमधून पोलिसांविषयी रोष व्यक्त करण्यात येत आहे.तर चोरट्यांनी पोलिसांना एक प्रकारे आव्हानच दिल्याचे दिसून येत आहे.

## सद्भावनेची मशाल तेवत राहिली पाहिजे-हर्षवर्धन सपकाळ

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.४ मे**




दिवसेंदिवस बिघडत चाललेला सामाजिक व जातीय सलोखा अबाधित राहावा या उद्देशाने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या वतीने मागच्या काही दिवसांपासून सद्भावना अभियान सुरु करण्यात आलेले आहे. आणि त्याच अनुषंगाने परळी मध्ये सुमारे चार तास सद्भावना सत्याग्रह करून सद्भावना वाढीसाठी प्रयत्न करण्यात आले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या संकल्पनेतून वाढत चाललेल्या सामाजिक व जातीय प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्रात सद्भावना वाढणे गरजेचे असल्याची संकल्पना मांडली. आणि त्यानुसार सद्भावना अभियानांतर्गत मागच्या कांही दिवसांपूर्वी मस्साजोग ते बीड पायी रॅली काढण्यात आली होती, आणि प्रतिसादही उत्स्फूर्त मिळाला होता.

तर दुसऱ्या टप्प्यात परळी वैजनाथ येथे सद्भावना सत्याग्रहाचे आयोजन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे नियोजन खा.रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा काँग्रेसच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, युवानेते आदित्य पाटील,उपाध्यक्ष ॲड. प्रकाश मुंडे, शहराध्यक्ष बहादूर भाई तसेच काँग्रेसच्या अन्य पदाधिकाऱ्यांनी केले. शनिवार दिनांक ३ मे रोजी परळी शहरातील मोंढा मैदान येथे सदरील सदभावना सत्याग्रहाचे आयोजन सकाळी दहा वाजता करण्यात एके होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांना अभिवादन करून वंदे मातरम ने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आणि यावेळी पहलगाम येथे निष्पापणे बळी गेलेल्या भारतीय नागरिकांना श्रद्धांजलीही अर्पण करण्यात आली. यानंतर सुमारे चार तास अतिशय शांततेमध्ये सत्याग्रह सुरू करण्यात आला. यावेळी शेकडो नागरिकांची उपस्थिती होती. समारोपप्रसंगी कार्यक्रमाच्या नियोजनाबद्दल जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रभारी कुणाल चौधरी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आपले विचार मांडले. त्यांनी बीड जिल्ह्यामध्ये जो काही सामाजिक आणि जातीय सलोखा बिघडलेला आहे त्यावर एकमेव उपाय म्हणजे प्रत्येकाच्या मनामध्ये सद्भावना वाढली पाहिजे सद्भावनेच्या दुधामध्ये जणूकाही बीडने मिठाचा खडा टाकावा अशी सध्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. प्रत्येक नागरिकाला शांतता हवी आहे मात्र बीड जिल्ह्यामध्ये अतिशय विदारक चित्र निर्माण झाले असून यावर कुणीतरी पुढाकार घेणे गरजेचे होते. आणि म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने सद्भावना वाढीसाठी सद्भावना अभियान सुरू केलेले आहे. सद्भावना सत्याग्रहामध्ये जे नागरिक सहभागी झाले ते अतिशय उत्स्फूर्तपणे सहभागी झालेले आहेत. आणि सत्याग्रहाचे आयोजनही बीड जिल्हा काँग्रेसचे पदाधिकारी तसेच परळी शहरातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी अतिशय उत्कृष्ट केले असेही ते म्हणाले. आपल्या विस्तृत भाषणामध्ये अनेक मुद्द्यांना स्पर्श करत हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित नागरिकांना मौलिक विचार दिले. आणि प्रत्येकानी सद्भावना वाढीस लागावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही मत व्यक्त केले. सदरील

काँग्रेसचे प्रभारी कुणाल चौधरी, माजी आमदार मोहन जोशी, बीड जिल्हा प्रभारी अमर खानापुरे, युवानेते आदित्य पाटील, नवनाथ थोटे, प्रदेश उपाध्यक्ष गणेश पाटील, प्रविकुमार शेप, पशुपतीनाथ दांगट, बाळासाहेब ठोंबरे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत तसेच तुकडोजी महाराजांच्या संगीतमय विचाराने करण्यात आली.

## सर्जरी विभागाचे राज्यातील सर्वात युवा प्राध्यापक म्हणून डॉ.नितीन चाटे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.४ मे**

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालययेथील सर्जरी विभागाचे डॉ. नितीन चाटे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झाली.स्वाराती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील गेली आठ वर्षांपासून सहयोगी प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून अतिरिक्त कार्यभार सांभाळत महात्मा जोतिबा फुले योजनेच्या भरीव कामातून राज्यभर आपली ओळख निर्माण केलेल्या डॉ.नितीन चाटे यांची नुकतीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राध्यापक पदी निवड करण्यात आली असून पदस्थापना स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात झाली आहे.



पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणासाठी विद्यार्थी म्हणून अंबाजोगाई येथे आलेल्या डॉ नितीन चाटे यांनी विद्यार्थी चळवळीत योगदान देत मार्ड संघटनेचे राज्य सचिव म्हणून काम केलेले आहे.विभागप्रमुख म्हणून गत आठ वर्षे कार्यरत असताना पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागांमध्ये चाळीस वर्षानंतर वाढ करण्यात आली. बीड जिल्ह्यातील पहिली ओपन हार्ट सर्जरी करून स्वाराती रुग्णालयाची मान उंचावली आहे.स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये, महात्मा फुले योजनेचे राज्य स्तरीय अभियान राबवून गेली सहा वर्षापासून अविरत काम करून प्रथम क्रमांकावर येण्याचा मान त्यांनी मिळवून दिला आहे या योजनेमधून आजपर्यंत हजारो रुग्णांना फायदा झालेला आहे. स्वाराती रुग्णालयामध्ये सर्जरी विभागाअंतर्गत मॉस्कीटो नेट मेश या अत्यल्प दरातील हर्निया सर्जरीची आंतरराष्ट्रीय स्तरावर नोंद घेण्यात आलेली आहे.त्याच कालावधीमध्ये स्वाराती रुग्णालयात थायरॉईड सर्जरीची अभिनव अभियान राबून कमी टाक्यांची मिनी-इंसिजन थायरॉईड शस्त्रक्रिया करणारे राज्यातील पहिले व एकमेव केंद्र बनवले आहे.सर्जरी विभागातील सहयोगी प्राध्यापक म्हणून आजपर्यंत त्यांच्या अनुभवाचा व कार्याचा रुग्णांना खूप मोठा फायदा झालेला आहे यामुळे परिसरातील जनतेचे आशीर्वाद व रुग्णांनी दिलेली प्रेमाची थाप हीच आपली शिदोरी समजून सेवेचे कार्य अविरतपणे चालू ठेवले याप्रसंगी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेमध्ये यश संपादन करून सर्जरी विभागातील प्राध्यापक म्हणून आज डॉ. नितीन चाटे सर यांना पदस्थापना करण्यात आली आहे.त्यांच्या निवड प्रसंगी जनतेतील व्यक्तींनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

स्वाराती रुग्णालयामध्ये गेली आठ वर्षापासून काम केल्याची मला पावती मिळाली माझ्याकडून जास्तीत जास्त रुग्णांची सेवा अविरतपणे अशीच घडत राहो अशी मी योगेश्वरी माते चरणी प्रार्थना करतो. जास्तीत जास्त रुग्णांना याचा फायदा व्हावा हीच माझी इच्छा आहे.

प्राध्यापक डॉ. नितीन चाटे
स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई

## होमिओपॅथी प्रभावी उपचार पध्दती, ग्रामीण भागात प्रसाराची गरज-मंत्री पंकजा मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.४ मे**




होमीओपॅथी विविध आजारांवरची प्रभावी उपचार पद्धत असल्याने या उपचार पद्धतीला जगमान्यता मिळाली आहे.आपल्या ग्रामीण भागात या पध्दतीचा प्रसार व प्रचार होणे गरजेचे आहे.परळीसारख्या शहरात डॉ.पुजा तोतला यांनी सुरु केलेले होमिओपॅथी क्लिनिक नक्कीच नावारुपास येईल असा विश्वास पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना.पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.

परळी शहरातील औद्योगिक वसाहत संकुलात डॉ.पूजा प्रितेश तोतला यांच्या वेदांत होमीओ क्लिनिक या होमिओपॅथीक रुग्णालयाचे उद्धाटन पंकजा मुंडे यांच्या हस्ते शुक्रवार २ मे रोजी करण्यात आले.यावेळी बोलताना ना.मुंडे यांनी होमिओपॅथी सारख्या नैसर्गिक उपचार पद्धती कडे आता लोक वळत असल्याचे सांगितले. डॉ तोतला यांच्या होमिओपॅथिक दवाखान्यामुळे ही गरज पूर्ण होईल असे सांगुन त्यांनी परळी शहराच्या मुख्य भागात सुरु केलेले हे रुग्णालय रुग्णांसाठी उपयुक्त ठरेल असा विश्वास व्यक्त केला.याकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.नमिता मुंदडा तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.शालिनी कराड,डॉ.स्मिता तापडिया,जुगलकिशोर लोहिया,डॉ. रमेश काबरा,भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे,डॉ.शशांक कोरे आदिंची उपस्थिती होती.प्रमुख पाहुण्यांचे स्वागत डॉ.पुजा तोतला व प्रितेश तोतला,सौ. रचना.सौ.मुग्धा,कैलाश बालकिशन,निलेश तोतला आदींनी केले.

# बस स्थानकात प्रवाशांना बसण्यासाठी २८ बेंच, थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

## दानशुर रामचंद्र कयाल यांचा पुढाकार, प्रवाशांमधून समाधान व्यक्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**

उन्हाची दाहकता पाहता येथील बस स्थानक परिसरात थंड पिण्याचे पाणी प्रवाशांना मिळावे यासाठी काही दिवसांपूर्वी पाच हजार लिटर पाणी असलेले वॉटर फिल्टर बसविले. त्यानंतर दि ४ मे रोजी प्रवाशांना बस स्थानकात बसण्यासाठी २८ बेंच स्वखर्चातून बसविण्यात आले आहेत. शहरातील सुप्रसिध्द कंत्राटदार रामचंद्र कयाल यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या कार्याबद्दल प्रवाशांमधून समाधान व्यक्त होत आहे.

हिंगोली बसस्थानकाची भव्य आणि सुसज्ज अशी इमारत तीन ते चार वर्षापूर्वी कोट्यावधी रूपये खर्च करून बांधण्यात आली. परंतु या बस स्थानकात बाहेरून येणाऱ्या प्रवाशांना तसेच स्थानिक प्रवाशांना बसण्यासाठी अत्यंत तुटपुंजे अशी आसन व्यवस्था करण्यात आली आहे. बस स्थानकात मोठ्या संख्येने महिला, मुली तसेच वृध्द प्रवाशी येत आ-हेत. त्यांना बसची वाट पाहत ताटकळत उभे रहावे लागते. बसण्यासाठी मोजकेच आसन असल्यामुळे अशा प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता. त्यातच काहीजण कंटाळून बस स्थानकातील फरशीवर देखील बसत असतांना दिसत होते.

सदरील बाब हिंगोली येथील दानशूर व सुप्रसिध्द कंत्राटदार रामचंद्र कयाल यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी दि ४ मे रोजी बस स्थानकात प्रवाशांना बसण्यासाठी व्यवस्था व्हावी यासाठी लोखंडी व प्लायवूडचे २८ बेंच बसविले. त्यामुळे स्थानकातील १२५ प्रवाशी लोकांना बसण्याची सोय झाली आहे. त्यांच्या कार्याबद्दल प्रवाशांनी त्यांचे आभार मानले आहेत.

सध्या हिंगोलीत तापमानाचा पारा ४२ अंशाच्यावर आहे. ग्रामीण भागातून शेतकरी, विद्यार्थी तसेच इतर प्रवाशी, बसचे चालक, वाहक यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती. एक महिन्यापूर्वी रामचंद्र कयाल यांनी याठिकाणी प्रवाशांसह सर्वांना थंड पिण्याचे पाणी मिळावे या हेतून पाणपोई सुरू केली आहे. यासाठी त्यांनी थंड पाणी प्रवाशांना मिळावे यासाठी वाटर कुलर लावण्यात आले आहे. त्याची जोडणी एक पाच हजार लिटरच्या पाण्याच्या टँकरला करण्यात आली आहे. प्रवाशांना थंड पिण्याचे पाणी मिळत आहे. अनेकजण थंड पाण्याची बॉटल भरून प्रवासात त्याचा उपयोग करीत आहेत. तीन ते चार दिवसांनी पाच हजार लिटरचे टँकर पुन्हा नियमित भरण्यात येत आहे. त्यामुळे भर उन्हात प्रवाशांना थंड पिण्याच्या पाण्याचा आस्वाद घेता येत आहे. या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.




# कुलगुरू डॉ. महाजन यांची आदर्शला भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत पदवी व पदव्युत्तर उन्हाळी परीक्षा-२०२५ चे मुल्यांकनाचे कार्य विविध मुल्यांकन केंद्रावर सुरू आहे. आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हिंगोली येथे पदवी परीक्षेचे ऑन स्क्रीन पद्धतीने मूल्यांकन केले जात आहे तर पदव्युत्तर परीक्षेचे ऑफलाइन पद्धतीने मूल्यांकनाचे कार्य सुरू आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी दिनांक ०३/०५/२०२५ रोजी हिंगोली येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला भेट दिली. या भेटीदरम्यान प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या समवेत ऑन स्क्रीन मूल्यांकन केंद्राला भेट देऊन मूल्यांकन केंद्राची पाहणी केली व ऑन स्क्रीन पद्धतीने मूल्यांकन संदर्भात येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या या वेळी ऑन स्क्रीन मूल्यांकन केंद्रप्रमुख प्रा. डॉ. रवी केने यांची उपस्थिती होती. तसेच पदव्युत्तर परीक्षेच्या ऑफलाइन पद्धतीने होणाऱ्या मूल्यांकन केंद्राला भेट देऊन मूल्यांकन केंद्राची पाहणी केली व मूल्यांकनाच्या व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी मूल्यांकन केंद्रप्रमुख प्रा. डॉ. अण्णाजी मडावी यांची उपस्थिती होती. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील दुर शिक्षण विभागाच्या पदव्युत्तर परीक्षा सद्या महाविद्यालयात सुरू असल्याने प्र. कुलगुरू यांनी परीक्षा विभागाला भेट देऊन उन्हाळी २०२५ परीक्षेच्या संदर्भात परीक्षा विभाग प्रमुख प्रा. डॉ. सत्यजित चव्हाण यांच्या सोबत चर्चा केली. यावेळी महाविद्यालयाच्यावतीने कुलगुरू डॉ अशोक महाजन यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कार्यालयीन अधीक्षक दिलीप दुबे, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. आनंद भट्ट, प्रा. डॉ. अण्णाजी मडावी इत्यादींची उपस्थिती होती.

# हिंगोलीत भगवान श्री परशुरामाची भव्य शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**

सकल ब्राह्मण समाजातंर्गत परशुराम ग्रुप आयोजित आज ४ मे रोजी भगवान श्री परशुराम जन्मोत्सव निमित्ताने शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ढोल ताशांच्या गजरात ही शोभायात्रा निघाली. यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.



दरवर्षी भगवान श्री परशुराम जन्मोत्सव निमित्ताने सकल ब्राह्मण समाजातंर्गत परशुराम ग्रुपच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमासह भव्य शोभा यात्रेचे आयोजन करण्यात येते. त्या निमित्ताने आज ४ मे रविवारी रोजी दुपारी ३.३० वाजता हिंगोली शहरातील मंगळवारा भागातील श्री दत्त मंदिरातून शोभायात्रेस प्रारंभ झाला. ही शोभा यात्रा माहेश्वरी भवन, देवगल्ली, मसानीपेठ, मारवाडी गल्ली, कपडा गल्ली, महात्मा गांधी चौक, जवाहर रोड, पोस्ट ऑफीस रस्त्यावरून रेल्वेस्टेशन रस्त्यावरील गायत्री भवनमध्ये शोभायात्रा सायंकाळी पोहोचल्यानंतर त्याकठिकाणी विधीवत पूजा केल्यानंतर ७.३० वाजता भव्य महाआरती करण्यात आली. त्यानंतर रात्री ८ ते १० वाजेपर्यंत भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. शोभा यात्रेत सकल ब्राह्मण समाज व परशुराम ग्रुपच्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी सहभाग घेवून परिश्रम घेतले.



**हिंगोली– भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे येथील कयाधू नदीवर पाणी अडविण्यासाठी बंधारे बांधकाम सुरू असून हे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. या बंधाऱ्यांमुळे येथील नदीपात्रात आता पाणी अडविले जाणार असून याचा फायदा परिसरातील शेतकऱ्यांना होणार आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राजे संभाजी महाविद्यालयात सहविचार सभा



हिंगोली– येथील राजे संभाजी कला विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात आ. सतीश चव्हाण यांनी सहविचार सभा घेऊन शिक्षकांचे प्रश्न, अडचणी जाणून शिक्षक आणि शिक्षण कसे असावे, सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार मेळावा, नामांकित कंपनीने महाविद्यालयामध्ये कॅम्पस मेळावा घेण्यासाठी शिक्षकांची चर्चा झाली. येणाऱ्या शैक्षणिक वर्षात पुन्हा एकदा आपण यावर बैठक घेऊन शैक्षणिक चर्चा करूया असे त्यांनी सांगितले. आ चव्हाण शिक्षकांचा पगार राष्ट्रीयकृत बँकेत सुरु होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आल्याबद्दल सर्व शिक्षकांच्या वतीने त्यांचे आभार सुद्धा मान्यता आले. या सभेसाठी पी आर हेंबाडे, उमेश मेटकर, सुधाकर बल्लाळ, विश्वासराव वानखेडे, हरिभाऊ मुटकुळे, दळवी, उप प्राचार्य राजकुमार वायचाळ, शेषराव जगताप, प्रा चव्हाण, एस एस कोथळकर, पंडित शिरसाट, शेख इम्रान, आत्माराम मंईग, सुजित देशमुख, शिवराज सरनाईक, विश्वासराव वानखेडे, श्री बोरकर, ओम इंगोले, अँड श्रीधर घुगे, अमर घुगे, प्राचार्य उमेश शेळके उपस्थित होते. त्याचबरोबर विनाअनुदानित कृती समितीचे पदाधिकारी यांनी निवेदन देऊन अनुदानाची मागणी सुद्धा केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन इंगळे यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक एस आर मेटकर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक संदीप जाधव यांनी केले.

### सगुणा रूरल फाऊंडेशनच्यावतीने आज शिबीर

हिंगोली– सगुणा रुरल फाउंडेशन नेरळ व उगम ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सगुणा पुनर्निर्मित तंत्रज्ञान व वन्य प्राण्यांपासून पीक, पशुधन व मनुष्यहानी, जनजागरण मोहीम व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन उगम ग्रामीण विकास संस्था उमरा तालुका कळमनुरी येथे ५ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत करण्यात आले असून या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून चंद्रशेखर भडसावळे संशोधक हे उपस्थित राहणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, विभागीय वनाधिकारी आर. पी. नाळे, सुनील बारसे अविनाश लहाने, अतुल वायसे आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्याचप्रमाणे मार्गदर्शन करण्यासाठी परशुराम अगविले शेतकरी शास्त्रज्ञ, अनिल निवळकर, शास्त्रज्ञ विठ्ठल वैद्य, रावसाहेब मोरे, सतीश खाडे ,विठ्ठलराव बदखल आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शेतकरी बांधवांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष जयाजी पाईकराव यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# विराटचे संस्थापक अध्यक्ष शेख नईम यांना मराठवाडा आयकॉन पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**



सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करत संघर्षातून उभारी घेतलेले विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलचे संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल यांना छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या एका कार्यक्रमात मराठवाडा आयकॉन सन्मान २०२५ ने सन्मानीत करण्यात आले.

याप्रसंगी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, मंत्री. ईतर मागासवर्गीय कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शेख नईम शेख लाल यांचा प्रवास हा नव्या पिढीसाठी प्रेरणास्रोत सामाजिक क्षेत्रात सेवा, नेतेपदात स्पष्टवक्तेपणा आणि लोक कल्याणासाठी त्यांची लढवय्यी भूमिका विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी आरोग्य शिबिरांपासून ते पर्यावरण संवर्धनापर्यंत त्यांनी आपली बांधिलकी अधोरेखित केली आहे. ग्रामीण जनतेशी थेट संपर्क आणि प्रशासनावरील दबावात्मक आंदोलने ही त्यांची खास शैली आहे. कोरोना काळातील मदतीने आणि अतिवृष्टीत तात्काळ मदतकार्याने त्यांची संवेदनशीलता दिसून आली.त्यांनी अनेक भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई घडवून आणत प्रशासनाला जवाबदारीची जाणीव करून दिली. त्यांच्या या लोकसेवेच्या कार्यासाठी त्यांना मराठवाडा आयकॉन' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. त्यांनी या यशाचे श्रेय त्यांचे आई, वडील, भाऊ तसेच त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना दिले आहे.

# सार्वजनिक बांधकाम उपविभाग १०० दिवस मोहीमेअंतर्गत सज्ज

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**



शासनाचे १०० दिवस मोहीमेअंतर्गत येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग सज्ज झाला असून या पार्श्वभूमीवर शासनाच्या विविध क्षेत्रात येणारी कामे त्याचे अंदाजपत्रके, इतर शासकीय पत्रव्यवहार यांच्या संचीका व्यवस्थीत करून प्रत्येक कर्मचाऱ्याने विभाग अद्यावत केला आहे.

येथील सार्वजनिक बांधकाम विभाग केवळ बांधकाम क्षेत्रापूरता मर्यादीत न ठेवता या परिसरात पाण्याचे पुर्नभरणही करण्यासाठी दोन विंधन विहीरीसाठी पावसाचे पाणी जमिनीत पुर्नभरण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान वापरून दोन पुर्नभरण हौद करण्यात आले आहेत. या परिसरातील पाणी वाहून न जाता त्याचे शंभर टक्के पुर्नभरण व्हावे या उद्देश आहे. यासोबतच या परिसरात वृक्षलागवड करण्यात आली आहे. या ठिकाणी अनेक प्रजातीचे पशु पक्षी येतात. पक्षांसाठी झाडांवर पाणी पिण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. जनावरांसाठी पाणी पिण्यासाठी विश्रामगृहाच्या प्रवेशद्वाराजवळ पाण्याचा हौद ठेवण्यात आला आहे. या सर्व उपक्रमात सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपविभागीय अभियंता सुदेश देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक अभियंता गजानन खोरणे, अभिषेक बुटोले, अनिल मोहोड, दयानंद धाडवे यांच्यासह कर्मचारी इब्राहीम गौरवे, प्रमोद पाठमोचे, मुजीब पठाण यांनी तर कंत्राटदार नाना बांगर, सुनील वाकोडकर यांनीही परिश्रम घेतले आहे.

# मयत कृषी पर्यवेक्षक व तलाठी यांच्या कुटुंबियांना न्याय देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**

मयत कृषी सहाय्यक राजेश कोल्हाळ व तलाठी पवार यांच्या कुटूंबियांना न्याय देण्याच्या मागणीसाठी शिष्टमंडळाने पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांची भेट घेतली. यावेळी पालकमंत्री झिरवाळ यांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना मागणी विषयी आदेशीत केले.

मयत कृषी सहायक राजेश कोल्हाळ व तलाठी पवार या दोन कुटूंबीयांना न्याय द्या, या मागणीसाठी बहुजन शिष्टमंडळाने पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांची गुरुवार दि.१ मे रोजी शासकीय विश्रामगृहात भेट घेतली. यावेळी आ.तान्हाजी मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते, जिल्हाधिकारी राहूल गुप्ता, प्रभारी पोलिस अधिक्षक अर्चना पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शिष्टमंडळाने जिल्हा कचेरी समोर माजी सभापती संजय उर्फ भैया देशमुख व मयताचे कुटुंबीय सागर कोल्हाळ, सुप्रिया पवार व इतर उपोषण करीत असून तातडीने न्याय देण्याची मागणी केली. यावेळी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी जिल्हाधिकारी गुप्ता यांना आदेशित करून तातडीने शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे आदेशित केले. तसेच पोलिस विभागालाही आदेशित करून तातडीने आरोपी अटक करण्याचे आदेशित केले. या शिष्टमंडळात कल्याण देशमुख, बालाजी वानखेडे, ॲड.उल्हास पाटील, खंडेराव सरनाईक, बाबाराव श्रृंगारे, डॉ.प्रल्हाद शिंदे, प्रकाश इंगोले, ऍड. दिलीप भाकरे, त्र्यंबकराव लोंढे यांची उपस्थिती होती.

# उपक्रमशील शिक्षक राजकुमार मोरगे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्यामार्फत समग्र शिक्षा व पीएम श्री ग्रंथालय उपक्रम २०२४-२५ मध्ये राजकुमार मोरगे यांच्या चित्रगाणी या पुस्तकाची इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांना पूरक वाचन म्हणून निवड करण्यात आली आहे. याबद्दल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्याकडून शिक्षक राजकुमार मोरगे यांचा सन्मान करण्यात आला. प्रथम आवृत्तीमध्ये १४ हजार ५०० प्रति छापलेले हे पुस्तक राज्यातील कानाकोपऱ्यात असलेल्या खेड्यापाड्यात शाळेतील विद्यार्थ्यांना वाचता येणार आहेत. इयत्ता १ली ते ३ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना वाचनात आवड निर्माण व्हावी तसेच वाचन अधिक सहजतेने मनोरंजक व्हावे म्हणून आशयास अनुसरून आकर्षक बोलक्या चित्रांचा सामावेश या पुस्तकात करण्यात आलेला आहे.

यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य दिपक साबळे, जेष्ठ अधिव्याख्यात्या जयश्री आठवले, अधिव्याख्याता धुमाळे, जाधव, देटे, बोडखे उपस्थित होते.